# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक ६ जुलै, २०२० / आषाढ १५, १९४२ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६०.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते कि, सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) सत्र शनिवार, दिनांक १४ मार्च, २०२० रोजी संस्थगित झाले. उपरोक्त दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविल्यानुसार लक्षवेधी सुचनांसंदर्भातील जोडपत्रामधील एकूण **३२** निवेदने आता शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : ६ जुलै, २०२०.

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व संबधित सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

६

लक्षवेधी सूचना क्रमांक :-

श्री. सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री अमिन पटेल, श्री. कुणाल पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखेने कोळशाने भरलेले २४ ट्रक माहे फेब्रुवारी, २०२० च्या दुसऱ्या आठवड्याच्या दरम्यान ताब्यात घेतले असून या प्रकरणात कोळशाच्या अफरातफरीचा ठोस पुरावा न मिळाल्याने अद्याप कुणावरही गुन्हा दाखल झाला नसल्याची बाब उघडकीस येणे, खनिकर्म महामंडळानेसुद्धा या कोळशाबाबत स्थानिक गुन्हे शाखेकडे खुलासा केलेला नसणे, गेल्या वर्षभरापासून संबंधित कंपन्यांच्या मागणीची महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने तपासणीच केली नसल्याची धक्कादायक माहिती समोर येणे, वास्तविक मागणी असलेला कोळसा खाणीतून ट्रकद्वारे उचलून तो ठराविक भूखंडावर टाकून त्याचे स्क्रिनिंग करुन अनावश्यक घटक काढून उरलेला कोळसा हा ट्रकद्वारे उचलला जात असताना त्याची नोंद खनिकर्म विभागाकडे असून, स्क्रिनिंग केल्यानंतर मागणी असलेल्या ठिकाणी हा कोळसा पोहचतो वा नाही, या कंपनीला नेमकी किती कोळशाची गरज आहे, याची नोंद खनिकर्म विभागाकडे असताना गेल्या ८-१० महिन्यांपासून खनिकर्म महामंडळाकडून अशी कोणतीही मागणी झालेली नसल्याने खाणीतून उचलेल्या कोळशाबाबत संभ्रमाची निर्माण झालेली स्थिती, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व प्रतिक्रिया."

## मा. मंत्री (उद्योग) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्ह्यातील स्थानिक गुन्हे शाखा यांना दि. १७/०२/२०२० ते दि. १८/०२/२०२० या कालावधीत कोल माईन्समधून निघालेला कोळसा हा संबंधित कंपनीत जाणे आवश्यक असतानाही अवैधरीत्या पोलीस स्टेशन, घुग्गस परिसरातील ग्राम नागाळा, जि. चंद्रपूर येथे गावाजवळ खाली करण्यात येत आहे अशी माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी ग्राम नागाळा येथील श्री. कैलास अग्रवाल व संजय जैन यांच्या कोल डेपोवर जाऊन पाहणी केली असता, तेथे एकूण २५ कोळशाचे ट्रक मिळून आले. त्यापैकी एका ट्रकमधील कोळसा उतरवलेला असून, इतर ट्रकमधील कोळसा उतरविण्याच्या बेतात होते. सदर ट्रकचालकाकडे चौकशी केली असता, त्यांनी गेट पास सादर केला आहे. त्यामध्ये कोळशाचे डिओ (Delivery Order) हे महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांच्या नावाचे असल्याचे आढळून आले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांना दि. २०/०२/२०२० च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन, घुग्गस, जि. चंद्रपूर परिसरात कोळशाने भरलेले व अर्धवट खाली केलेले २७ ट्रक मिळून आले आहेत असे कळविले होते. त्या अनुषंगाने महामंडळाने दि. २०/०२/२०२० रोजी पोलीस निरीक्षक यांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वापराबाबत मार्गदर्शक तत्वांची माहिती व

पोलीसांनी दि. १८/०२/२०२० रोजी करण्यात आलेली चौकशीची माहिती लक्षात घेता, कोळशाच्या गैरवापरावर व परिवहनात अनियमितता दिसून आल्यास चौकशी अहवाल महामंडळास सादर करावा. जेणेकरुन महामंडळास नियमानुसार कार्यवाही करता येईल असे कळविले होते. तद्नंतर पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांनी दि. २४/०२/२०२० च्या पत्रान्वये महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळास वरील प्रमाणे नमूद केलेल्या घटनेत २७ ऐवजी २५ ट्रकचा उल्लेख करुन योग्य ती चौकशी करुन गैरव्यवहार होत असल्याचे आढळून आल्यास पोलीस स्टेशन, घुग्गस येथे तक्रार करावी असे कळविले होते. त्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने मे. रोशन लाईम वर्क्स, राजूर, ता. वणी, जि. यवतमाळ च्या मालकाने त्यांना आवंटित झालेल्या १७१.०० मेट्रिक टन कोळशापैकी १००-८७ मे.टन. ची आवश्यकता नसतानाही उचल करुन बनावट कागदपत्र तयार करुन श्री. कैलास अग्रवाल/शहेजाद शेख यांच्यासोबत संगणमत करुन महामंडळाची दिशाभूल करुन फसवणूक केली आहे अशी तक्रार दि. २४/०२/२०२० रोजी १९.१८ वा. पोलीस स्टेशन, घुग्गस येथे केली आहे. त्या अनुषंगाने पोलीस ठाणे यांनी संबंधितांविरुद्ध गु.र.क्र. ४९/२०२० हा भा.द.वि. संहीत कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर यांच्यामार्फत सुरु आहे.

महाराष्ट्र राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वाटपासंदर्भात मार्गदर्शक तत्वे दि. १२/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार जिल्हास्तरीय वाटप समितीद्वारे केलेल्या कोळशाच्या मात्रेनुसार महामंडळाद्वारे उद्योग घटकांसोबत वार्षिक कोळसा पुरविण्याकरीता ०२ वर्षाच्या कालावधीसाठी इंधन पुरवठा करारनामा करण्यात येतो. त्यामध्ये उद्योग घटकांची मागणी व केंद्र शासनसाच्या एमएसएमईने दिलेल्या उद्योगाच्या क्षमता प्रमाणपत्रानुसार मासिक कोळसा मात्रा उद्योगाला किती लागणार, या संदर्भात इंधन पुरवठा करार करुन दर महिन्याला वेस्टर्न कोलफिल्ड लि. (WCL) यांच्यासमवेत केलेल्या करारनाम्यानुसार त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कोळशाप्रमाणे उद्योग घटकासोबत झालेल्या इंधनपुरवठा करारानुसार कोळशाची मात्रा उद्योग घटकाला आवंटित केली जाते. तथापि, शासन नियुक्त यंत्रणेकडून केलेली मागणी व वेस्टर्न कोलफिल्ड यांनी उपलब्ध करुन दिलेली कोळशाची मात्रा यामध्ये तफावत असल्यास उद्योग घटकांना प्रो-राटा काढून उद्योग घटकाला आवंटित करण्यात येतो.

तसेच उद्योग घटकाकडून आलेली वास्तविक मागणी लक्षात न घेता, तसेच वाटप करण्यात आलेल्या कोळसा खाणीतून उद्योग घटकांपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी उद्योग घटकाची असते. तद्नंतर कोळसा उद्योग घटकाच्या ठिकाणी पोहोचवल्यानंतर ट्रकचे गेट पास व किती कोळसा उचल करण्यात आलेला आहे तसेच विद्युत देयके, जीएसटी रिटर्न इ. बाबतची माहिती उद्योग घटकाद्वारे महामंडळास सादर करणे आवश्यक असते. दर तीन महिन्यामध्ये किती कोळशाची उचल झालेली आहे आणि किती कोळसा वापरण्यात आलेला आहे तसेच उद्योग घटकात शिल्लक असलेल्या कोळशाची संपूर्ण माहिती उद्योग घटकास महामंडळाला विहीत नमुन्यातील परिशिष्ट ६ नुसार सादर करणे आवश्यक आहे.

वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्याकडून दर महिन्याला त्यांच्यासोबत झालेल्या इंधन पुरवठा करारानुसार कोळसा वाटपाकरीता खाणनिहाय व खाणीतील मात्रानिहाय बाबतची माहिती महामंडळास कळविण्यात येते. त्यानंतर महामंडळाद्वारे वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्याकडे कोळशाची मागणी करण्यात येते. सदर कंपनीद्वारे (WCL) दिलेल्या कोळशाची मात्रा व उद्योग घटकासोबत झालेल्या इंधन पुरवठा करारानुसार महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ हे उद्योग घटकाला कोळशाचे वितरण करते.

महाराष्ट्र राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना शासन नियंत्रण यंत्रणेमार्फत वितरीत करण्यात येणाऱ्या कोळशाच्या वाटपासंदर्भात वितरीत होणाऱ्या कोळशाचा उद्योग घटक त्याच्या स्वत:च्या उत्पादनाकरीता वापर करतो किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राने पर्यवेक्षीय पथकाची स्थापना केली आहे. त्यानुसार सदर तपासणी पथक हे उद्योग घटकाची तपासणी करतात. तसेच परिशिष्ट ६ मधील माहिती व सोबत जीएसटी रिटर्न आणि विद्युत देयके महामंडळाकडे सादर केली जातात. त्याचप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या तपासणी पथकाद्वारे २१ उद्योग घटकांची तपासणी करण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त ज्या उद्योग घटकांनी आवश्यक असणारे दस्ताऐवज सादर केलेली नाहीत अशा एकुण २२ उद्योग घटकांचे कोळसा वाटप महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने बंद केलेले आहे.

महाराष्ट्र खनिकर्म महामंडळाने वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्यासोबत वार्षिक ७.२६ लक्ष मेट्रिक टन इतका कोळशाचा इंधन पुरवठा करार केलेला असून, प्रती महिना ६०,५०० मेट्रिक टन याप्रमाणे मागील ०८ महिन्यांमध्ये एकुण ४,८४,००० मे. टन कोळशाची मागणी महामंडळाने वेस्टर्न कोलफिल्ड लि. यांच्याकडे केली असून, एकूण २७३ उद्योग घटकांना प्राप्त झालेल्या कोळशाचे वाटप करण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळाने मे. रोशन लाईम वर्क्स, राजूर, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्याविरुद्ध पोलीस स्टेशन, घुग्गस येथे गु.र.क्र. ४९/२०२० हा भा.द.वि. संहीतेच्या कलमानुसार दि. २४/०२/२०२० रोजी गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. त्या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हा शाखा, चंद्रपूर यांच्यामार्फत सुरु आहे. तसेच पुढील अंतिम कार्यवाही होईपर्यंत सदर उद्योग घटकास कोळशाचा पुरवठा बंद करण्यात आलेला आहे. प्रस्तुत बाब विभागाच्या निदर्शनास आल्यानंतर याविषयी तपास यंत्रणेस सर्व कागदपत्र व माहिती पुरविण्यात यावी व चौकशीस सहकार्य करावे. तसेच या प्रकरणात कोणतीही अनियमितता/गैरव्यवहार आढळल्यास संबंधितांविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या सूचना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांना दिल्या आहेत.

---------x---0---x---------

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री. देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड आशिष शेलार, श्री. अतुल भातखळकर, ॲड पराग अळवणी, सर्वश्री संजय केळकर, राम कदम, वि. स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**" रत्नागिरी (जि. रत्नागिरी) येथील कारागृहात बंदीवान असलेल्या सखाराम भागा गोरुले यांची दिनांक ०३ फेब्रुवारी, २०२० रोजी दुपारी १२.३० वाजण्याच्या सुमारास प्रकृती अचानक बिघडणे, याप्रकरणी कारागृहातील कामावर असलेल्या कर्मचा-याने गोरुले यांना शासकीय रुग्णालयात हलविले असता रुग्णालयातील वैदयकीय अधिका-यांनी त्यांना मृत घोषित केल्यामुळे निर्माण झालेले संशयाचे वातावरण, बंदीवानाच्या मृत्युनंतर त्याचा मृतदेह शव विच्छेदनासाठी कोल्हापूर येथील न्यायवैद्यक महाविद्यालयात पाठविलेला असणे, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, व शासनाची प्रतिक्रिया."**

---

### मा.गृह मंत्री यांचे निवेदन

रत्नागिरी विशेष कारागृह येथील न्यायाधीन बंदी क्र. २१८/२०२० सखाराम भागा गोरुले, वय ६७ वर्षे हा दि. ३०.०१.२०२० रोजी देवरुख पोलीस स्टेशन ठाणे क्लेम नं. १४/२०२० मा. न्यायदंडाधिकारी वर्ग-१ देवरुख यांचे वॉरंट अन्वये रत्नागिरी विशेष कारागृह येथे दाखल झालेला होता.

बंदी सखाराम भागा गोरुले यांची दि. ०३.०२.२०२० रोजी कारागृहात पहाटे ०२.३० च्या सुमारास अचानक प्रकृती खालावल्याने न्यायाधीन बंदी नितेश सुरेश मोरे याने कर्तव्यावरील कारागृह शिपाई श्री. प्रदिप महादेव अपुणे यांचे निदर्शनास आणुन दिले. सदर कर्मचारी तात्काळ कारागृहातील सर्कल २ बॅरेक २ समोर गेला असता न्यायाधीन बंदी सखाराम भागा गोरुले हा बॅरेकमधील फरशीवर झोपुन थरथरत असल्याचे आणि त्याच्या बाजुला न्यायाधीन बंदी नितेश सुरेश मोरे बसुन असल्याचे पाहिले. सदरची बाब तात्काळ

संबंधित कर्मचा-याने  कर्तव्यावरील अंमलदार श्री. राजेश नारायण शिंदे(हवालदार), रात्रपाळी आज्ञांकीत अधिकारी श्री. अनंत गणपत सावर्डेकर (सुभेदार) यांच्या निर्दशनास आणून दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सदर बंदयास तात्काळ रात्री २.४० वाजता सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथे कारागृह कर्मचारी श्री. सचिन किसन शिंदे, श्री. गोपीचंद रामदास पाटील, श्री. तुकाराम ज्ञानदेव घुटुगडे, कारागृह शिपाई व श्री. संदिप मोहनराव चव्हाण, औषध अधिकारी यांनी दाखल केले. सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथील वैदयकीय अधिकारी यांनी बंदयास तपासले आणि रात्री ३.०० वाजेच्या सुमारास बंदी सखाराम भागा गोरुले हा मयत झाल्याचे घोषित केले.

बंदी सखाराम भागा गोरुले याचे मृत्युसंदर्भात दि. ०३.०२.२०२० रोजी रत्नागिरी शहर पोलीस स्टेशन यांचेकडील आकस्मिक मृत्यु रजि. क्र ०८/२०२० सी. आर.पी.सी. १७४ अन्वये आकस्मिक मृत्युबाबत नोंद केली असून पुढील चौकशी सुरु आहे.

मा. दुसरे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी व नायब तहसिलदार, रत्नागिरी व इतर संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे उपस्थितीत दि. ०३.०२.२०२० रोजी मयत बंदी सखाराम भागा गोरुले याचा मरणोत्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच महाराष्ट्र शासन गृह विभाग, यांचेकडील परिपत्रक दि. ०२.०८.२०१८ अन्वये पोलीस कोठडी व कारागृह कोठडीतील नैसर्गीक मृत व्यक्तीचे शवविच्छेदनासाठी असलेल्या मार्गदर्शन सुचनेनुसार छत्रपती शाहु महाराज वैद्यकीय महाविदयालय, कोल्हापूर येथे मयत बंदी सखाराम भागा गोरुले याचे शवविच्छेदन करण्यात आलेले आहे.

अधीक्षक, रत्नागिरी विशेष कारागृह यांनी त्यांचेकडील पत्र दि. ०३.०२.२०२० अन्वये मृत बंदी सखाराम भागा गोरुले याचा आकस्मिक मृत्युसंबंधी फौजदारी संहितेच्या कलम १७६(अ) १ नुसार चौकशी होणेबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने मा. मुख्य न्यायदंडाधिकारी, रत्नागिरी यांनी दि. ०४.०२.२०२० अन्वये बंदी सखाराम भागा गोरुले यांच्या मृत्युप्रकरणी चौकशी सुरु केली आहे.

-------०-------

H 1630-Lu.

सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, श्री. अबू आजमी, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालील प्रमाणे आहे :-

"राज्य पोलीस दलात सरळ सेवा पोलीस उपअधिक्षक म्हणून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा परीक्षेद्वारे नियुक्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना पोलीस उपअधिक्षक पदाच्या मुळ वेतन श्रेणीचा लाभ मिळणे, सदरहू पोलीस उपअधिक्षक पदावरील अधिकाऱ्यांना त्यांच्या सेवा जेष्ठतेनुसार पोलीस अधिक्षक (असंवर्ग) पदावर बढती मिळाल्यानंतर मात्र त्यांना पोलीस अधिक्षक पदाची वेतन श्रेणी न मिळता फक्त ग्रेड पे मध्ये बदल होत असल्याने भरतीनंतरही यांना पदोन्नतीच्या कालावधीत वेतन श्रेणी व त्यामुळे होणारा आर्थिक लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास येणे, मात्र या उलट महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या राज्य सेवा स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून महसूल सेवेत किंवा विक्रीकर विभागाच्या सेवेत सरळसेवा उपजिल्हाधिकारी पदावर निवड होणाऱ्या उपअधिक्षक समकक्ष पदावरील उपजिल्हाधिकारी पदावरील अधिकाऱ्यांना अतिरिक्त जिल्हाधिकारी पदावर बढती मिळाल्यानंतर त्या पदाची वेतनश्रेणी अधिक ग्रेड पे याचा लाभ मिळत असल्याचे निदर्शनास येणे, अशाप्रकारे लोकसेवा स्पेर्धा परिक्षेच्यात माध्यमातून एकाच वेळी राज्याच्या गृह विभागात आणि महसूल किंवा विक्रीकर विभागात समकक्ष पदावर निवड होणाऱ्या अधिकाऱ्यांमध्ये त्यांना पदोन्नतीनंतर मिळणाऱ्या आर्थिक लाभांमध्ये मोठ्या प्रमाणावर तफावत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, उपजिल्हाधिकारी पदावरील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पुढील पदावरील वेतन श्रेणीचा लाभ सलग दहा वर्षे पूर्ण झाल्यानंतर मिळत असणे तर गृह विभागातील पोलीस अधिक्षक पदावरील अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या पदावरील पुढील वेतनश्रेणी २७ वर्षे सलग सेवा झाल्यानंतर मिळत असल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील पोलीस अधिक्षक पदावरील सरळ सेवेच्या मध्यमातून स्पर्धा परीक्षेद्वारे भरती झालेल्यांरमध्ये पसरलेली नाराजीची भावना व त्यांच्या कार्यशैलीवर होत असलेला परिणाम, पोलीस अधिक्षक (असंवर्ग) पदावरील अधिकाऱ्यांना महसूल सेवा किंवा विक्रीकर विभागातील समकक्ष अधिकाऱ्यांप्रमाणे समान वेतन श्रेणी सातवा वेतन आयोगात लागू करुन त्यांना न्याय मिळवून देण्याची आवश्यकता, या अधिकाऱ्यांना अन्य शासकीय अधिकाऱ्यांप्रमाणे पाच दिवसांचा आठवड्याचा लाभ अथवा कामाच्या वेळेची कालमर्यादा लागू होत नसल्याने निदान गृह विभागातील अधिकाऱ्यांना आणि महसूल किंवा विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांमध्ये असलेली पदोन्नतीचा पदावरील वेतन श्रेणीची तफावत तात्काळ दूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (गृह) यांचे निवेदन

राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदाकरिता सहाव्या वेतन आयोगानुसार रू. १५,६००-रू. ३९१००/- + ग्रेड वेतन रू. ५,४००/- ही वेतनश्रेणी होती व सातव्या वेतन आयोगानुसार एस-२० रू.५६,००० - रू.१,७७,५०० हा वेतनस्तर आहे. पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील अधिकाऱ्यांना सेवाप्रवेश नियमानुसार पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या पदावर पदोन्नतीचे पद आहे. पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या पदास सहाव्या वेतन आयोगानुसार रू. १५,६००- रू. ३९१००/- + ग्रेड वेतन रू. ६,६००/- ही वेतनश्रेणी होती व सातव्या वेतन आयोगानुसार एस-२३ रू.६७,७०० - रू.२,०८,७०० हा वेतनस्तर आहे. पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त या संवर्गातून पोलीस अधीक्षक/पोलीस उप



[क्रमशः प.

आयुक्त (असंवर्ग) या संवर्गात पदोन्नती झाल्यानंतर पदोन्नतीप्रमाणे त्यांची पोलीस अधीक्षक (असंवर्ग) या पदावर वेतननिश्चिती होते.

राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातून पोलीस अधीक्षक/पोलीस उप आयुक्त (असंवर्ग) या संवर्गात पदोन्नती झाल्यानंतर त्यांचे भारतीय पोलीस सेवेत (IPS) नामनिर्देशन होईपर्यंत एकाच वेतनश्रेणीत कार्यरत असतात. त्यामुळे राज्यातील महसूल अधिकारी, वित्त विभागाचे विक्राकर अधिकारी आणि अन्य राज्यातील पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या धर्तीवर राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांना सेवाकालावधीनुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यांकडून शासनास प्राप्त झाला होता.

केंद्रीय सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणीची शिफारस करण्याकरिता वित्त विभागाच्या दि. १७ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. के. पी. बक्षी, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ गठित करण्यात आली होती. या समितीच्या कार्यकक्षेत सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचनेची शिफारस करणे आणि सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेत त्रुटी असल्यास, त्या दूर करण्याबाबत शिफारशी करणे, या दोन बाबी प्रामुख्याने अंतर्भूत होत्या. त्यामुळे राज्य वेतन सुधारणा समितीला मंत्रालयीन प्रशासकीय विभाग, अधिकारी/ कर्मचारी संघटना यांच्यांकडून निवेदने व प्रस्ताव स्विकारण्याकरिता https:// mahaseventhpay.in हे ऑनलाईन वेब पोर्टल सुरू केले असून सदरचा प्रस्ताव /निवदने ऑनलाईन सादर करण्याबाबत वित्त विभागाने कळविले होते. त्यानुसार राज्य पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांच्या वेतनश्रेणीबाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची/निवेदनाची माहिती ऑनलाईन वेब पोर्टल सादर केली आहे.

सातव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतन संरचनेच्या शिफारशींचा समितीचा अहवाल खंड-१ शासनास दिनांक ५ डिसेंबर, २०१८ रोजी सादर झाला होता. सदर अहवालातील शिफारशींवर निर्णय घेऊन दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सुधारित वेतन संरचनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे. विविध प्रशासकीय विभागांमधील विविध संवर्गांच्या सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन आयोगातील वेतनत्रुटींसंदर्भात कर्मचारी संघटनांकडून तसेच वैयक्तिकरित्या एकूण सुमारे ३८०० ऑनलाईन निवेदने / मागण्या समितीकडे प्राप्त झाल्या आहेत.

वर नमूद निवेदने / मागण्या विचारात घेऊन समितीने सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन संरचनेतील त्रुटींसंबंधीच्या शिफारशींचा समितीचा अहवाल खंड-२ दिनांक २९ ऑगस्ट, २०१९ रोजी शासनास सादर केला होता. परंतु सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने शासनाने समितीकडून अधिक स्पष्टीकरणात्मक माहिती मागविली आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी शासकीय कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशांनुसार समितीने अहवाल खंड-२ लवकरात लवकर शासनास सादर करावा, असे दिनांक ५ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या पत्रान्वये समितीस कळविण्यात आले आहे. पोलीस उप अधीक्षकांना सेवाकालावधीनुसार वेतनश्रेणी लागू करण्यासंदर्भात समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यावर वित्त विभागाच्या सल्ल्यानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

*****

एचट ९६५१-९३१-

(३२)

## लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र क्रमांक ३२

## सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

डॉ. विनय कोरे, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना (सूचनांचे जोडपत्र क्रमांक ३२) पुढील प्रमाणे आहे.

" चांदोली (ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर) येथील कडवी मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये चांदोली लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले असून सदर दोन्ही प्रकल्प लाभक्षेत्रात चांदोली, जावली व वारुळ या गावातील एकूण २४४ हेक्टर जमिन सामायिक क्षेत्रात येणे, या सामाजिक क्षेत्रातील चांदोली गावाच्या १३ खातेदारांची जमिन कडवी मध्यम प्रकल्प व चांदोली लघू प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आल्याने प्रकल्पग्रस्त खातेदारांकडून दोन्ही प्रकल्पाच्या कामात अडथळे निर्माण करणे, चांदोली ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील कडवी मध्यम प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या जमिनी वगळण्याबाबत कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ व मुख्य अभियंता, पुणे यांना संबंधितांकडून पत्र व्यवहार करणे, तसेच चांदोली ल. पा. तलाव व कडवी मध्यम प्रकल्प या दोन्ही प्रकल्पात समायिक व परस्पर व्यापजी होत असलेली २४४ हेक्टर जमिन कडवी मध्यम प्रकल्पाचे लाभक्षेत्रातून वगळणेबाबत निर्णय शासनस्तरावर घेणेबाबत जिल्हाधिकारी व उपसंचालक प्रकल्प पुनर्वसन (जमिन) कोल्हापूर विभाग यांनी शासनास पत्र व्यवहार करणे. तसेच कृष्णा खोरे महामंडळाकडून शासनास शिफारस आलेली असणे, तरी सुध्दा शासनाने अशी जमिन वगळली नसल्यामुळे जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेची भावना, शासनाने तातडीने सदर जमिन वगळण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रीया."

## मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन :-

कडवी मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये चांदोली लघु पाटबंधारे प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आल्याने, सदर दोन्ही प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रात मौजे चांदोली, जावळी व वारुळ या गावातील २४४ हेक्टर जमिन सामाईक लाभ क्षेत्रात येत असून सदर गावचे क्षेत्र लाभ क्षेत्रातून वगळण्याबाबत जलसंपदा विभागाने त्यांच्या दिनांक ०१.०८.२००२ रोजीच्या पत्रान्वये " प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेण्यास महामंडळ सक्षम असून महामंडळाचे स्तरावरच उचित निर्णय घेण्यात यावा. " असे कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना सूचना दिलेल्या आहेत. त्यास अनुसरुन महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांनी त्यांच्या दिनांक २४.०९.२००२ रोजीच्या पत्रान्वये दोन्ही प्रकल्पात सामाईक असलेले २४४ हेक्टर क्षेत्र, कडवी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातून वगळण्यास महामंडळाने मान्यता दिलेली आहे.

२. सदर प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील १२ स्लॅबपात्र खातेदारांची एकूण २० हे ८६ आर जमिन संपादित करण्यात आली असून सदर क्षेत्रावर शासनाचा ताबा असल्याने, सदरचे क्षेत्र मुळ मालकास परत करण्याबाबत भूसंपादन अधिनियम १८९४ मध्ये कोणतीही तरतूद नमुद केलेली नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिका क्रमांक ३६२८/१९९७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार संबंधित मुळ मालकास संपादित क्षेत्र परत करता येत नाही.

३. स्लॅबपात्र खातेदारांच्या जमिनीवरील हस्तांतरण व्यवहारावर असलेले निर्बंध उठविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत शासनाच्या दिनांक ०५.०८.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्व जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत.

************************

<u>सन २०२० चे २ रे (अर्थसंकल्पिय) अधिवेशन</u>

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी पुढीलप्रमाणे आहे :-**

**"पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्र" या देशाची सांस्कृतिक, शैक्षणिक, आरोग्य व तळागाळातील व्यक्ती/कुटुंबे यांचे सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी मोठया प्रमाणावर सामाजिक कार्य करण्याच्करिता सदरहू संस्थेस सुसज्ज कार्यालय, प्रेक्षागर, चर्चासत्र, प्रशिक्षण व्यवस्था कार्यशाळेसाठी राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने मुंबईतील जवाहर भवन, चर्नीरोड, भूखंड क्रमांक १७३६ मधील सावित्रीबाई फुले वसतीगृह इमारतीला लागून असलेल्या १० हजार ९३० चौ.मी. क्षेत्रफळाचा रिक्त भूखंड आरक्षण बदलून वितरीत करण्यात आल्याचा नुकताच उघडकीस आलेला प्रकार, सदरहू संस्थेचे विश्वस्त हे राजकीय पक्षाचे लोकप्रतिनिधी असून त्यांनी पदाचा दुरुपयोग करुन व शासकीय अधिका-यांवर दबाव टाकून सदरहू भूखंड पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्रासाठी मंजूर करुन घेण्यात येणे, सदरहू भूखंड नाटयगृह व वस्तु संग्रहालय ऐवजी शिक्षण भवन बांधण्याकरिता आरक्षित असणे, अशाप्रकारे आरक्षित भूखंड सदरहू संस्थेस राजकीय पक्षाची कामे करण्याकरिता बेकायदेशीररित्या वितरीत करण्यात येणे, यामुळे शासकीय भूखंडाचा मोठया प्रमाणात झालेला अपव्यय, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, यामुळे जनतेमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने हस्तक्षेप करुन तातडीने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."**

---

<u>मा.मंत्री (महसूल) श्री. बाळासाहेब थोरात यांचे निवेदन</u>

शासन निर्णय क्र.एलबीएल.२५७८/३५५८५/जी-८, दिनांक २०.०४.१९७९ अन्वये गिरगांव महसूल विभागातील भूकर क्र.१७३६ क्षेत्र ३२१७.४२ चौ.मी. ही मिळकत ९९ वर्षाच्या कालावधीसाठी मुलांचे नाट्यगृह व वस्तू संग्रालय (Children's Theatre-cum-Museum Only) या प्रयोजनासाठी नाममात्र दराने महाराष्ट्र राज्य जवाहर बाल भवन मंडळ यांना विविध अटी व शर्तीस अधीन राहून भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. सदर मिळकतीची स्थळपाहणी केली असता जमीन प्रदान आदेशातील अट क्र. ५, १३ व १४ या अटींचे पालन होत नसल्याने निदर्शनास आल्याने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमन, १९६६ मधील कलम ५३ व ५४ अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये याबाबत आवश्यक कागदपत्रासह खुलासा सादर करण्याबाबत दिनांक १०.०१.२०१९ रोजी महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मंडळ या संस्थेस जिल्हाधिकारी मुंबई शहर यांच्या स्तरावरुन सुनावणी देण्यात आली. तद्नंतर प्रकरणी शासकीय मिळकत अतिक्रमणापासून मुक्त ठेवण्यास जवाहर बालभवन मंडळ असमर्थ ठरले असल्याने महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन यांची विनंती अमान्य करुन सदर मिळकतीचे जमीन प्रदान आदेशातील अटी व शर्तीचा भंग केल्याच्या अनुषंगाने जमीन प्रदान आदेशातील अट क्र. २२ नुसार मिळकत इमारतीसह महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ५३ व ५४ मधील तरतूदीनूसार

सरकार जमा करण्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दिनांक १७.०१.२०१९ रोजीचे आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाविरोधात संबंधितांनी अपर आयुक्त कोकण यांच्याकडे अपिल दाखल केले होते. सदर प्रकरणी अपर आयुक्त, कोकण यांनी दिनांक ०७.०२.२०१९ रोजीच्या आदेशान्वये दाखल केलेले अपील फेटाळून जिल्हाधिकारी मुंबई शहर यांचे दिनांक १७.०१.२०१९ रोजीचे आदेश कायम केले आहेत. अपर आयुक्त कोकण विभाग यांच्या सदर आदेशाविरुद्ध संचालिका,महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन मंडळ, मुंबई यांनी मा.मंत्री (महसूल) यांच्याकडे दि.९.४.२०१९ रोजी फेरतपासणी अर्ज दाखल केला. मा. मंत्री (महसूल) यांनी दि.२६.८.२०१९ रोजीच्या आदेशान्वये अर्जदाराचा फेरतपासणी अर्ज फेटाळून अपर आयुक्त, कोकण यांचे दि.०७.२.२०१९ रोजीचे आदेश कायम केले आहेत.

खजिनदार, पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्र यांनी त्यांच्या संस्थेला सूसज्ज असे कार्यालय, प्रेक्षागर, चर्चासत्रांसाठी व तज्ञ व्यक्ती मार्गदर्शक यांच्या बैठकांसाठी संस्थेची उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या प्रशिक्षणाची व्यवस्था, कार्यशाळांचे आयोजन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन व इतर सर्व अनुषंगिक बाबींसाठी सूसज्ज इमारत असणे आवश्यक असून सदर इमारतीसाठी शा.नि क्र.जमीन-२०१८/प्र.क्र.३८/ज-१, दिनांक २५.०७.२०१९ या शासन निर्णयातील मुद्दा क्र.९ मधील तरतूदीनुसार गिरगांव महसूल विभागातील भूकर क्र.१७३६ हा शासकीय भुखंड नाममात्र दराने भाडेपट्टयाने मिळणेबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना दि.२५.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये विनंती केली आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी दि.३०.०८.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केलेला आहे. तथापि, शासनाने पंडित दिनदयाळ उपाध्याय केंद्र या संस्थेस गिरगांव महसूल विभागातील भूकर क्र.१७३६ हा शासकीय भूखंड अद्याप मंजूर केलेला नाही.

*********

H-1593-1a

## लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र क्रमांक ४६

## सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

श्री. भारत भालके, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना (सूचनांचे जोडपत्र क्रमांक ४६) पुढील प्रमाणे आहे.

" जिल्हा सोलापूर येथील पुनर्वसन विभागामध्ये प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटप करणे वा त्याचा मोबदला संबंधित प्रकल्पग्रस्तांना/धरणग्रस्तांना देण्याचे शासनाचे धोरण असणे, परंतु शासनाचे यापूर्वीचे आदेश विचारात घेऊनच सोलापूर जिल्हयातील धरणग्रस्तांना पुनर्वसन कार्यालयाकडून आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी करुन त्यानुसार योग्य पध्दतीने जमिनीचे वाटप करण्यात येत असताना पूर्वीची पध्दत बंद करुन तथापि गेल्या वर्षापासून सोलापूर जिल्हा पुर्नवसन कार्यालयाकडून बेकायदेशीपणे अधिक गैरव्यवहार करुन जमिनीचे वाटप करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, तसेच यामध्ये कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे उघडकीस येणे, प्रचलित कायदा व नियमानुसार येथे जमीन वाटप करताना धरणग्रस्तांची धरणासाठी संपादित झालेली जमीन, कुटुंबातील व्यक्तींची संख्या यानुसार त्या जिल्हयातील पुनर्वसन कार्यालय त्या धरणग्रस्तास देय जमीन मंजूर करते. तसेच मौजे मल्लेवाडी ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथे गट क्र. १५६/२/ब बनावट आदेश करुन वाटप केलेले असणे, तसेच याबाबतची तक्रार संबंधित शेतकऱ्यांनी दाखल करण्यात येणे, तसेच बाधित शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा इशाराही दिलेला असणे, पुनवर्सनाच्या नवीन गावठाणच्या भूखंड वाटपात पुनर्वसनवासियांना त्यांना वाटप झालेल्या जमिनीचे आदेश परिशिष्टप्रमाणे पावती पंचनामा व झालेल्या जमिनीच्या सातबारा व नमुना ड प्रमाणपत्र तसेच सदर भूखंड वाटपाच्या आदेशाबाबत प्रकल्पस्तांस जबाबदार धरुन कोणतीही पूर्वसूचना न देता शासनाने किंवा संबंधित पुनर्वसन विभागाने दिलेला भूखंड रद्द करण्यात येणे, तसेच अनेक भूखंड वाटपाला मागणी असताना काही एजंन्ट यांना किंवा दलाल यांना मध्यस्थी करुन वाटप करण्यात येणे, तसेच मंगळवेढा येथील गट नं. ८७ ते ९१ मध्ये भूखंड क्र.५४९ मध्ये क्षेत्र २००० चौ. फुटांचा भूखंड पसंत करण्यात आलेला असणे, परंतु संबंधित पुर्नवासित शेतकऱ्यांला अद्यापही कोठेही भूखंड मिळालेला नसणे, तसेच सन ऑगस्ट, २०१७ मध्ये मंगळवेढा येथील कार्यकारी दंडाधिकारी यांच्यासमोर प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आलेले असणे, परंतु मंगळवेढासह पंढरपूर तालुक्यातील काही स्थळ पाहणी न करता भूखंड वाटप आदेश केलेला आहे. परंतु मुळात सदर भूसंपादन चुकीचे असून न्यायालयात केस सुरु असतांना अशा बेकायदा व चुकीच्या पध्दतीने भूखंड वाटप करुन मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केलेला असणे, तसेच यामध्ये संबंधित पुनर्वसन अधिकारी यांनी बेकायदेशीरपणे अर्ज, चुकीचे दाखले देणे, बनावट आधारकार्ड तसेच पॅनकार्ड बोगस तयार करुन एजंन्ट हाताशी धरुन सुमारे ६०० एकर जमिनीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येणे, तसेच याबाबत पुणे, सोलापूर, सातारा या भागातील १३७ तक्रारी दाखल झालेल्या असणे, त्यानुसार त्या धरणग्रस्तास कोणत्या जिल्हयात जमीन वाटप करावयाची त्याचा प्रस्ताव सदरील पुनर्वसन कार्यालयात उपलब्ध असतो अशी पूर्वीची पध्दत बंद करणे, सोलापूर जिल्हयात पुनर्वसन कार्यालयाकडून कागदपत्रांची खातरजमा न करता जमिनीचे वाटप झालेले असणे, पुनर्वसन विभागातील अधिकारी मोहिनी चव्हाण जिल्हा पुनर्वसन अधिकारी सोलापूर यांनी केलेल्या गैरव्यवहार, तसेच अप्पर जिल्हाधिकारी अंतिम सही शिफारशीशिवाय होत नाही. त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेऊन सदर प्रकरणी मूळ प्रकल्पबाधित आहेत त्यांना तातडीने न्याय देऊन अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी असणे, तसेच शासनाने सदर आर्थिक गैरव्यवहाराची एक समिती नेमून सखोल चौकशी करावी अशी पुर्नवासियांची मागणी असणे, तसेच शासनाने मागील एक वर्षापासूनच्या सर्व

प्रकरणांची (व्यवहाराची) चौकशी करण्याची आवश्यकता असणे, तसेच या प्रकल्पग्रस्ताच्या पुनर्वसन करण्याबाबत शासनाने मूळ प्रकल्पबाधित असलेल्या नागरिकांना न्याय देणे आवश्यक असणे, परंतु शासनाने याबाबत सध्या कोणतीही भूमिका घेतली नसल्याने प्रकल्पबाधित जनतेचा शासनाच्या प्रति व पुनर्वसन विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या प्रती सामान्य जनतेमध्ये तीव्र संतापाची भावना पसरलेली असणे, परिणामी शासनाने तातडीने भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करुन त्यांना निलंबित करणे अशी बाधित प्रकल्पग्रस्तांची मागणी, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

**मा. मंत्री (मदत व पुनर्वसन) यांचे निवेदन :-**

जिल्हा पुनर्वसन कार्यालय, सोलापूर यांचेतर्फे सोलापूर जिल्हयातील लाभक्षेत्रामध्ये उजनी प्रकल्प, सोलापूर जिल्हयातील इतर पाटबंधारे प्रकल्प तसेच सातारा जिल्हयातील कोयना, वीर, धोम, कण्हेर या प्रकल्पातील पात्र प्रकल्पग्रस्तांना शासनाच्या प्रचलित निकषांनुसार आणि आवश्यक त्या कागदपत्रांची छाननी करुन पर्यायी जमीनीचे वाटप करण्यात येते. शासनाच्या प्रचलित निकषांनुसार पात्र प्रकल्पग्रस्तांना संपादन झालेल्या क्षेत्रानुसार आणि संपादनावेळी असलेल्या कुटूंबसख्येनुसार पर्यायी जमीनीचे वाटप केले जाते.

२. मौजे मल्लेवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील गट नं. १५६/२ हे क्षेत्र कायदेशीर रीत्या संपादित केले असून सदरचे क्षेत्र दिनांक ०७.०३.१९९१ च्या आदेशान्वये श्री. बंडु शंकर पंडीत, रा. कोट्रोशी, ता. जावळी यांना वाटप केले आहे. सदर क्षेत्राची दिनांक १३.०९.२०१३ रोजीच्या तहसील मंगळवेडा यांच्या आदेशाव्दारे शर्त कमी करण्यात आली आहे. उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन), सोलापूर यांच्या दिनांक २०.११.२०१५ च्या आदेशान्वये श्री. बंडू व महादेव शंकर पंडीत या दोघांची नावे या मिळकतीस सहहिस्सेदार म्हणून लावण्यात आली. सदर क्षेत्राबाबत पंढरपूर येथील न्यायालयात ३४/२०१६ नुसार दावा दाखल करण्यात आला होता. त्याप्रकरणी दाव्यातील पक्षकार कै. बंडू शंकर पंडीत म. वा. राजाराम पंडीत व महादेव शंकर पंडीत यांच्यात तडजोड होऊन तो दिनांक १५.१२.२०१७ रोजी निकाली निघाला आहे.

३. मौजे मंगळवेढा येथील गट नं. ८७ ते ९१ मधील भूखंड क्र. ५४९ (क्षेत्र २००० चौ. फुट) ची मागणी श्री. नामदेव भिवा कदम कोयना प्रकल्पग्रस्त यांनी दिनांक २३.०८.२०१७ च्या अर्जान्वये केली होती व त्यांना यापूर्वी भूखंड वाटप केला नसल्याने त्याच्या पंसतीनुसार सदर भूखंडाचा स्थळ पाहणी अहवाल दिनांक १७.११.२०१७ रोजी प्राप्त झाल्यानुसार अर्जदारास सदरच्या भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. सदर गट नं. ८७ ते ९१ च्या संपादनासंदर्भात श्री. गणेश सुखदेव मेटकरी व संजय सुखदेव मेटकरी यांनी पंढरपूर येथील दिवाणी न्यायालयात दाखल केला आहे. सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असून मा. न्यायालय यांचा सदर भूखंड वाटपास कोणत्याही प्रकारे स्थगिती आदेश नाही.

४. अपर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिनांक १४.०३.२०२० रोजी सादर केलेल्या अहवालानुसार दिनांक ०१.०१.२०१८ ते १४.०३.२०२० या कालावधीतील उजनी प्रकल्पातील ५९ प्रकल्पग्रस्तांना ५९.८८ हे. आर. क्षेत्र व जवळगांव (सोलापूर) प्रकल्पातील ३ प्रकल्पग्रस्तांना ६ हे. ०४ आर आणि सातारा जिल्हयातील ५ प्रकल्पग्रस्तांना ४ हे. ०२ आर इतके क्षेत्र वाटप करण्यात आले आहे. सदर क्षेत्र वाटपबाबतची कार्यवाही महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रक व निकष विचारात घेऊन सदरचे क्षेत्र संबंधित प्रकल्पग्रस्तांना वाटप करण्यात आले आहे.

***********************

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**श्रीमती सीमा हिरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"महापालिकेच्या मिळकतींना रेडीरेकनरच्या अडीच की, अर्ध्या टक्का दराने भाडे आकारणी करायची हा वाद सुरू असतानाच राज्य सरकारने नव्या मिळकत धोरणानुसार आठ टक्के दराने भाडेआकारणी आदेशाची अंमलबजावणी करण्याचे स्मरण नाशिक मनपा प्रशासनाला करून देणे, त्यामुळे प्रशासनाने यापुढे दिल्या जाणा-या मिळकतींना आठ टक्के दरानेच भाडेआकारणी करण्याचा निर्णय घेणे, या निर्णयानंतर १९७४ गाळ्यासह ९४५ मिळकतींना महापालिका पुन्हा शासनाच्या धोरणानुसार आठ टक्के दराने भाडेआकारणी करणार असल्याने मिळकतींचा वाद उपस्थित होणे, नाशिक मनपा प्रशासनाने यातून मार्ग काढण्यासाठी या मिळकतींना रेडीरेकनरच्या अडीच टक्के दराने भाडेआकारणीचा निर्णय घेतला घेणे, तत्कालीन सरकारने मिळतींसंदर्भात नवीन धोरण निश्चित करीतं मिळकतींना महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, मुद्रांक उपजिल्हाधिकारी यांची समिती ठरवेल, तो दर किंवा रेडीरेकनरच्या आठ टक्के दर यापेक्षा जे अधिक असेल असा दर आकारण्याचा निर्णय घेणे, तसेच प्रथम जाहीर लिलाव काढण्याचे तसेच, भाडेपट्टा करार नोंदणीकृत करण्याबाबत आदेशित करणे, माहे जानेवारी २०२० मध्ये राज्य सरकारच्या नगर विकास विभागाने मिळकतींसंदर्भात दिनांक १३ सप्टेंबर २०१९ रोजी काढलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना महापालिकेला केल्या जाणे, आधीच अडीच टक्के दराने मिळकती परवडत नसताना, आणि महासभेने अर्धा टक्के दराचा ठराव केला असताना, आठ टक्के दराने आकारणी कशी करायची यावरून प्रशासन पेचात पडले असणे, यामुळे १९७४ गाळ्यांसह ९४५ मिळकतींचे भवितव्य टांगनीला असणे, प्रत्येक मिळकतींना किमान आठ टक्के दर आणि मुद्रांक शुल्कांनुसार नोंदणीची सक्ती झाल्यास मिळकत धारकांना त्या न परवडणे, नव्याने मिळकती या लिलावाव्दारे द्याव्या लागणार असल्याने लिलावाचे दर आणि मुद्रांक शुल्काची रक्कम घेणा-यास परवडणार नसल्याने या मिळकती धूळ खात पडून त्यांचा गैरवापर वाढण्याची शक्यता असणे, याकरीता मिळकत धोरणाचा पेच सोडविणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि प्रतिक्रिया"**

---

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ७९ मध्ये महापालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेच्या विनियोगाची तरतूद आहे.

महानगरपालिकांच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या स्थावर मालमत्तांचे भाडे करार संपुष्टात आल्यावर अशा भाडे करारांचे नुतनीकरण करण्याबाबत अधिनियमात सुस्पष्ट तरतूद करण्याच्या

रोटा/एच- 1584 (750-3-2020)

/क्र.म.प.

दृष्टीने, सन २०१८ चा अधिनियम क्र.५५, दि.१३.०८.२०१८ अन्वये अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, अधिनियमातील कलम ७९ (क) मध्ये सुधारणा करून, जाहिर लिलावाची कार्यपध्दती अनुसरून भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांच्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण शासनाने विहीत केलेल्या नियमावलीनुसार करता येईल अशी तरतूद करण्यात आली.

अधिनियमातील तरतूदी, राज्यातील काही महापालिकांनी यापूर्वी विहीत केलेले नियम, शासन आदेश यानुषंगाने शासनाने दिनांक २७.०५.२०१९ रोजीच्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम, २०१९ हे प्रारूप नियम प्रसिध्द केले. विहीत तरतूदीनुसार सदर प्रारूप नियमांबाबत प्रसिध्दीपासून ३० दिवसांचा कालावधी सूचना व हरकतीसाठी ठेवण्यात आला. उक्त कालावधीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून, दिनांक १३.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेअन्वये अंतीम अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर नियमावलीतील तरतूदीनुसार, नुतनीकरणासाठी मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या आठ टक्के किंवा बाजारभावाप्रमाणे निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल इतके भाडे मूल्यांकन समिती निश्चित करेल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) मधील तरतूदीनुसार, महानगरपालिकांच्या मालमत्तांचे भाडे हे बाजारभावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सर्वसाधारणत: राज्यातील महानगरपालिकात अशाच पध्दतीने भाडे आकारणी होती. सबब, अधिनियमातील स्पष्ट तरतूद, महानगरपालिकातील प्रचलित भाडे आकारणी व महानगरपालिकांचे आर्थिक हीत या बाबी विचारात घेऊन, सदर नियमावली व दरनिश्चिती करण्यात आली आहे. सदर नियमावलीमुळे आता राज्यातील सर्वच महानगरपालिकांच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांचे नुतनीकरण करताना कार्यपध्दती व दर याबाबत एकवाक्यता राहील.

तद्अनुषंगाने, नाशिक महानगरपालिकेने देखील शासनाने विहीत केलेल्या नियमावलीनुसार कार्यवाही करणार असल्याचे कळविले आहे.

******

H/1584-19

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**सर्वश्री. संदिप क्षिरसागर, बाळासाहेब आजबे, सुनिल भुसारा, प्रकाश सोळंके, राजू कारेमोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"बीड नगर परिषदेमध्ये अमृत अभियान अंतर्गत सुमारे ११५ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजना आणि १६६ कोटी रुपयांच्या भूयारी गटार योजनेच्या कामात कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झालेला असणे, कंत्राटदाराने निविदेतील अटी व शर्तींचा भंग करणे, विहित मुदतीत काम पूर्ण न झाल्याने नागरीकांना ऐन उन्हाळयाच्या दिवसांत भिषण टंचाई परिस्थितीला सामोरे जाण्याची वेळ येणे, पाणी पुरवठा योजनेमध्ये २८ हजार नळ जोडणी करण्याचे उद्दिष्ट असताना कामाची मुदत पूर्ण होवूनही कंत्राटदाराने केवळ ३ हजार नळ जोडणी केलेली असणे, योजनेच्या कामासाठी शहरातील रस्त्यांचे अवैध खोदकाम केल्यामुळे निष्पाप नागरीकांच्या जिविताला धोका निर्माण होणे, खड्ड्यांमुळे अनेक नागरीकांना जीव गमवावा लागणे, भुयारी गटार योजनेचा प्रकल्प अहवाल करताना अनेक गैरकायदेशीर व चुकीच्या बाबींचा त्यामध्ये समावेश केलेला असणे, शासनाची गायरान जमीन पालिकेची असल्याचे भासवून ही जागा मलनिस्सारण केंद्रसाठी प्रस्तावित करण्यात येणे, प्रकल्प अहवालात नगर पालिकेने अनेक बाबींच्या माध्यमातून शासनाची दिशाभूल केलेली असणे, सुमारे १६४ किमी लांबीच्या भुयारी गटार योजनेच्या कामापैकी केवळ ३० किमी काम कंत्राटदाराने पूर्ण केलेले असणे, महाराष्ट्र नगर परिषद लेखासंहिता व अधिनियमातील तरतुदीनुसार कामाच्या दर्जा बाबत कोणतीही तपासणी अथवा शहानिशा न करता कंत्राटदाराला नगर पालिका प्रशासन, जीवन प्राधिकरण यांनी संगणमताने कोट्यावधी रुपयांचे बेकायदेशीररित्या देयाकांचे प्रदान केलेले असणे, पाणीपुरवठा योजना आणि भुयारी गटार योजनेचे काम विहित मुदतीत पूर्ण न झाल्यामुळे शहरातील नागरीकांमध्ये शासन विरोधी संतापाची भावना निर्माण होणे, नियमित आणि वेळेवर कर भरणाऱ्या नागरीकांना पालिका प्रशासन आणि कंत्राटदाराच्या गैरकारभारामुळे मनस्ताप सहन करण्याची वेळ येणे, बीड जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांनी या प्रकरणी घेतलेल्या आढावा बैठकीत अनेक गंभीर बाबी समोर येणे, या सर्व प्रकारांची उच्चस्तरीय समितीकडून चौकशीकरण्याची मागणी करुन दोषीविरुद्ध कडक कारण्याची आवश्यकता निर्माण होणे, शासनाकडून याप्रकरणी होत असलेला अक्षम्य विलंब, तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."**

**-: <u>मा.मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-**

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत बीड शहराच्या रुपये ११४.६३ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास शासनाने दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर योजनेची अंमलबजावणी कार्यान्वयन यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे. सदर पाणी पुरवठा योजनेतील कामे निविदेतील अटी व शर्तींनुसार प्रगतीपथावर आहेत. जल उदधरण नलिकेची कामे ठिकठिकाणी शेतकऱ्यांनी वेळोवेळी अडवलेली असल्यामुळे, तसेच शाहू नगर जलकुंभ व नाळवंडी नाका (१८.७० लक्ष लीटर) जलकुंभाच्या जागा बदलल्यामुळे गुरुत्व वाहिनी व वितरण व्यवस्थेच्या कामात तांत्रिक बदल होत असल्याने प्रकल्पांतर्गत कामांस विलंब होत आहे.

बीड शहरास माजलगाव व बिंदुसरा धरणातून पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत दोन्ही धरणात पुरेसा पाणीसाठा उपलब्ध आहे. त्यामुळे सद्या शहरास पाणीटंचाई नाही. बीड शहरातील रस्त्यांवर पाणी पुरवठा योजनेचे खोदकाम करतेवेळी सूचनाफलक तसेच इतर सुरक्षात्मक उपाय करण्यात येत आहेत त्यामुळे नागरिकांच्या जीवाला

हिंगोली शहर रस्ते विकास प्रकल्पांतर्गत शहरात मंजूर ५७ रस्त्यांपैकी १२ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून कामांच्या पूर्णत्वाची टक्केवारी १२.१७ टक्के आहे. सदर कामे अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार करण्यात येत आहेत.शासनाने विहित केलेल्या श्री गुरु गोविंदसिंघजी इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण संस्थेमार्फत या कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात येत आहे तसेच कामावरील साहित्याची गुणवत्ता तपासणी (Quality Control) हे सक्षम प्राधिकरणाकडून करण्यात येत आहे.

हिंगोली रस्ते प्रकल्पाच्या अनुषंगाने खोदकाम व इतर बाबींवर आतापर्यंत रुपये ४,६९,७५९ एवढा खर्च झालेला असल्याने व इतर सर्व कामे शासन निर्णयातील तरतूदीनुसार होत असल्याने याबाबत कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाल्याचे दिसून येत नसल्याने याबाबतीत वेगळी कार्यवाही करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.

**********

H-1591-1a

लक्षवेधी सूचना (७२)

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे व्दितीय ( अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**मा.श्री. सुरेश भोळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"जळगांव महानगरपालिकेत गेल्या कित्येक वर्षापासून २३८७ गाळे धारकांवर महानगरपालिका प्रशासनाने गाळे धारकांना बजावलेले दंडात्मक बिले, व मालमत्तावरील बोजा लावण्याच्या घोषणामुळे महानगरपालिका प्रशासनाविरोधात गाळेधारक एक झाले असून, तरी सुध्दा गेल्या ७ वर्षाचे थकीत भाडेपैकी काही प्रकारच्या करांच्या रक्कमेचे धनादेश गाळे धारकांनी यावर्षी महानगरपालिकेला दिले असून, काही कोटी रक्कम मनपात जमा असुन तरी गाळेधारकांना अनधिकृत करण्याचे ठरविले असणे, जळगांवच्या विकासात गाळे धारकांचे मोठे योगदान असणे, योग्य नुतनीकरणासह योग्य भाडे भरण्यास सर्व गाळेधारक नेहमीच तयार असणे, परंतु अवास्तव लाखोंचे भाडे, दंड घरादारांवर बोजा आकारल्याने गाळेधारक उध्वस्त होण्याची निर्माण झालेली शक्यता, यामुळे पालिकेच्या २० व्यापारी संकुलातील २३८७ गाळेधारक व त्यांचे कुटुंबीय त्यांच्यावर अवलबूंन असलेले कर्मचारी, अशा ४० हजार नागरिकांचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने अधिसूचना प्रसिध्द केलेली दिनांक २७.०५.२०१९ शासन राजपत्रित प्रकाशित झालेले असून, सदरील राजपत्र महाराष्ट्र महानगरपालिका ७९ "ड" संदर्भात प्रारुप नियमावलीत सूचना व हरकतीसाठी प्रकाशित केले होते तसेच आम्ही सूचना व हरकतीसाठी नगर विकास विभाग व मुख्यमंत्री साहेब यांच्याकडे लेखी निवेदन देऊन सुध्दा आम्हाला सुनावणीची संधी मिळाली नाही याबाबतचा कोणताही विचार न करता दिनांक १३.०९.२०१९ रोजी अंतिम अधिसूचना प्रसिध्द केली गेली हया अधिसूचनेत कलम ३ मधिल पोट कलम २ अपेक्षित सुधारणा मालमत्तेच्या मूल्यांकनाच्या ८ % रक्कम ऐवजी २% ते ४% निश्चित करण्यात यावे असे महोदय आयुक्तांना अधिकार देण्यात यावे व कलम ३ मधील पोट कलम ४ भाडे पट्टयाचे नूतनीकरण हे किमान तीस वर्षासाठी असेल असे नमूद करण्यात यावे तसेच कलम ३ मधील पोटकलम ३ पैकी १ रद्द करुन गाळे ज्यांच्या ताब्यात व मनपा दप्तरी ज्याचे नावाने आज नोंद असेल अशा गाळेधारकांना सरसकट नुतनीकरणाची परवानगी देण्यात यावी व कलम ३ मधील पोटकलम ३ पैकी ५ शिथिल करण्यात यावा असे नविन शुध्दीपत्रक काढून त्वरीत गाळेधारकांच्या बाजूने न्याय मिळवून द्यावा याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि प्रतिक्रिया."**

---

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ७९ मध्ये महापालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेच्या विनियोगाची तरतूद आहे.

रोटा/एच- १५७१(७५०-३-२०२०) क्र.मा.प.

महानगरपालिकांच्या भाडेपट्ट्याने दिलेल्या स्थावर मालमत्तांचे भाडे करार संपुष्टात आल्यावर अशा भाडे करारांचे नुतनीकरण करण्याबाबत अधिनियमात सुस्पष्ट तरतूद करण्याच्या दृष्टीने, सन २०१८ चा अधिनियम क्र.५५, दि.१३.०८.२०१८ अन्वये अधिनियमात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, अधिनियमातील कलम ७९ (क) मध्ये सुधारणा करून, जाहिर लिलावाची कार्यपध्दती अनुसरून भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांच्या भाडेपट्ट्यांचे नुतनीकरण शासनाने विहीत केलेल्या नियमावलीनुसार करता येईल अशी तरतूद करण्यात आली.

अधिनियमातील तरतूदी, राज्यातील काही महापालिकांनी यापूर्वी विहीत केलेले नियम, शासन आदेश यानुषंगाने शासनाने दिनांक २७.०५.२०१९ रोजीच्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थावर मालमत्ता भाडेपट्टा नुतनीकरण अथवा हस्तांतरण) नियम, २०१९ हे प्रारूप नियम प्रसिध्द केले. विहीत तरतूदीनुसार सदर प्रारूप नियमांबाबत प्रसिध्दीपासून ३० दिवसांचा कालावधी सूचना व हरकतीसाठी ठेवण्यात आला. उक्त कालावधीत प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींचा विचार करून, दिनांक १३.०९.२०१९ रोजीच्या अधिसूचनेअन्वये अंतीम अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर नियमावलीतील तरतूदीनुसार, नुतनीकरणासाठी मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या आठ टक्के किंवा बाजारभावाप्रमाणे निश्चित होणारे वार्षिक भाडे यापैकी जे जास्त असेल इतके भाडे मूल्यांकन समिती निश्चित करेल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९ (ड) मधील तरतूदीनुसार, महानगरपालिकांच्या मालमत्तांचे भाडे हे बाजारभावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. सर्वसाधारणत: राज्यातील महानगरपालिकात अशाच पध्दतीने भाडे आकारणी होती. जळगांव महापालिकेमधे सुध्दा अशाच दराने भाडे निश्चित करून देयके दिली असल्याचे कळविले आहे. सबब, अधिनियमातील स्पष्ट तरतूद, महानगरपालिकातील प्रचलित भाडे आकारणी व महानगरपालिकांचे आर्थिक हीत या बाबी विचारात घेऊन, सदर नियमावली व दरनिश्चिती करण्यात आली आहे. त्यामुळे याबाबत शुध्दीपत्रकाची आवश्यकता नाही.

तसेच, जळगांव महापालिकेने कळविल्यानुसार, महानगरपालिकेच्या व्यापारी संकुलातील २३८७ गाळेधारकांची मुदत मार्च, २०१२ मध्येच संपली होती त्यामुळे महापालिकेचे होत असलेले नुकसान विचारात घेऊन, महानगरपालिकेच्या महासभेच्या ठरावानुसार, अनाधिकृत गाळे ताब्यात ठेवणा-या संबंधीतांना सिध्द शीर्ध गणकानुसार देयके बजावणे व दंड आकारण्याचे धोरण निश्चित केले होते. संबंधीत गाळेधारकांच्या मालमत्तांवर कोणत्याही प्रकारचा बोजा लावण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच, याबाबतची कार्यवाही अधिनियमातील तरतूदीनुसार करण्यात येत आहे.

एम-1579-19

******

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री. संतोष बांगर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

**"महाराष्ट्र सुवर्ण-जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत हिंगोली नगरपरिषदेच्या हददीतील ५७ रस्त्यांची कामे तसेच भूमिगत गटार योजनेची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होत असून तसेच विकास कामाच्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनागोंदी करुन कंत्राटदारास फायदा होण्याच्या अनेक त्रुटी ठेवून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याप्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करुन तातडीने उक्त कामांना स्थगिती देण्याबाबतची मागणी जिल्ह्यातील विविध सामाजिक संघटनांनी जिल्हाधिकारी. हिंगोली यांना निवेदनाव्दारे तसेच लोकप्रतिनिधिंनी मा. मुख्यमंत्री मा. नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २०/१२/२०१९ रोजी पत्रव्यवहार करुन केलेली मागणी उक्त पत्राच्या अनुषंगाने झालेल्या गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी तसचे उक्त कामांना तातडीने स्थगिती देण्यास होत असलेला विलंब, सदर गैरव्यवहार प्रकरणी सखोल चौकशी करुन यास जबाबदार असणाऱ्याविरुध्द कठोर कारवाई करण्यास शासनाकडे होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."**

-: मा.मंत्री (नगर विकास) महोदय यांचे निवेदन :-

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हिंगोली नगरपरिषदेस रुपये १०१.०९ कोटी किंमतीच्या रस्ते विकास प्रकल्पांतर्गत ५७ रस्त्यांच्या कामांना शासनाने दिनांक ०६ जून, २०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे.

हिंगोली रस्ते विकास प्रकल्पाच्या कामांची निविदा प्रक्रिया ही शासनाच्या ई-निविदा पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करुन पूर्ण करण्यात आली आहे. त्यात नगर विकास व सार्वजनिक बांधकाम विभागांच्या शासन निर्णयानुसार आवश्यक तरतूदीनुसार पारदर्शक पध्दतीने निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदेची जाहिरात आवश्यक त्या सर्व वृत्तपत्रांमध्ये देण्यात आलेली आहे. त्यामुळे कंत्राटदारास फायदा होण्यासाठी कोणत्याही प्रकारची त्रुटी निविदा प्रक्रियेत ठेवण्यात आलेली नाही अथवा कंत्राटदारास सूट दिलेली नाही.

सदर रस्ते विकास प्रकल्पांतर्गत शहरात मंजूर ५७ रस्त्यांपैकी १२ रस्त्यांची कामे प्रगतीपथावर असून कामांच्या पूर्णत्वाची टक्केवारी १२.१७ टक्के आहे. सदर कामे अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार करण्यात येत आहेत. शासनाने विहीत केलेल्या श्री. गुरु गोविंदसिंघजी इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, नांदेड या त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण संस्थेमार्फत या कामांचे तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आले आहे. उपरोक्त

रस्त्यांची सर्व कामे शहर अभियंता व उप अभियंता, हिंगोली नगरपरिषद यांच्या तांत्रिक देखरेखेखाली अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार विहीत मुदतीत पूर्ण करुन घेण्याचे हिंगोली नगरपरिषदेचे नियोजन आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत रुपये ६९.४३ कोटी किंमतीच्या भुयारी गटार प्रकल्पास दिनांक २२ डिसेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता दिली आहे. या भुयारी गटार प्रकल्पांतर्गत कामांच्या निविदा प्रक्रियेनंतर दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजी कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पातील ९५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत. सदर कामे अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार करण्यात येत असून उक्त शासन निर्णयानुसार त्रयस्थ लेखापरिक्षण संस्था शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या मार्फत वेळोवेळी तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात आले आहे. त्यानुसार प्रकल्पाचे काम समाधानकारक असल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकल्पांतर्गत कामांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून तांत्रिक मार्गदर्शन व देखरेखीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्प ३१ मार्च, २०२० पर्यंत कार्यान्वित करण्याचे हिंगोली नगरपरिषदेचे नियोजन आहे. अंतिम देयक प्रदान करण्यापूर्वी पुन्हा एकदा तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेण्यात येणार आहे.

लोक विराट मंच नावाच्या सामाजिक संघटनेने या प्रकल्पासहीत विविध योजनांची एकत्रित निवेदन वजा तक्रार विविध ठिकाणी केलेली आहे. तसेच, मा. लोकप्रतिनिधींनी या प्रकल्पांमधील कामांना स्थगिती देऊन चौकशी करण्याची शासनाकडे मागणी केली आहे. यासंदर्भात रस्ते व भुयारी गटार या दोन्ही योजनेतील कामांची त्रयस्थ संस्थेकडून फेर तांत्रिक लेखापरिक्षण करण्याच्या व तांत्रिक लेखापरिक्षण अहवाल प्राप्त होईपर्यंत कोणतेही देयक प्रदान करण्यात येऊ नये अशा सूचना देण्यात येत आहेत.

**********

पद 1590-1८

(७३)

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२० चे प्रथम (अंर्थसंकल्पीय) अधिवेशन**

**श्री.सुभाष धोटे, श्रीमती.प्रतिभा धानोरकर, श्री.विकास ठाकरे, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री.अमीन पटेल, कुणाल पाटील, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे.:-

**"राज्यातील नागपूर महानगरपालिकेमध्ये सन १९९७-९८, १९९८-९९ व १९९९-२००० या वर्षात क्रीडा साहित्य खरेदीमध्ये कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याबाबत नंदलाल समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने दोषींवर अद्यापही कारवाई करण्यात न येणे; सदरचे क्रीडा साहित्य महापालिकेच्या निवडून आलेल्या नगरसेवकांना तसेच नामनिर्देशित नगरसेवकांना त्यांच्या प्रभागामध्ये वाटप करण्यासाठी देण्यात आल्याचे भासवून महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी व नगरसेवकांनी एकत्रित येऊन सामुग्रीकरिता महापालिकेची आर्थिक लूट करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे उघडकीस आले असतांना व नंदलाल समितीने अहवाल शासनास सादर केला असतानाही अद्याप या प्रकरणी चौकशी व दोषींवर कारवाई करण्यात आली नसल्याने सर्वसामान्य नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत राज्यशासनाने तातडीने चौकशी करुन दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."**

---

**मा.मंत्री (नगरविकास) यांचे निवेदन**

नागपूर महानगरपालिकेने सन १९९७ ते २००० या तीन वर्षाच्या कालावधीत खरेदी केलेल्या क्रिडा साहित्य आणि त्याच्या वाटपामध्ये भ्रष्टाचार झाल्याच्या आरोपावरुन, शासनाकडून नियुक्त नंदलाल समितीने पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविले होते व शिफारशी केल्या होत्या.:-

नागपूर महानगरपालिकेने सन १९९७ ते २००० या तीन वर्षाच्या कालावधीत रु.२,३८,३९,१७७/- एवढ्या किंमतीच्या खेळांच्या साहित्याची निविदा न मागविता, सक्षम अधिकाऱ्यांची मान्य न घेता, विहित कार्यपध्दती न अवलंबता खरेदी केल्याचे दिसून आले आहे. तसेच या खरेदीमध्ये पुरवठादार,नगरसेवक,अधिकारी यांनी संगनमताने बोगस कागदपत्रांच्या आधारे देयके काढलेली आहेत. त्यानंतर या खरेदी केलेल्या साहित्याच्या वितरणाच्या नोंदी व्यवस्थीत ठेवलेल्या नाहीत, साहित्य संबंधितांना मिळाले किंवा कसे याबाबतची कोणतीही खात्री केलेली नाही. या सर्व प्रकरणात तत्कालीन अतिरिक्त उपआयुक्त, क्रिडा अधिकारी, संबंधित नगरसेवक हे जबाबदार असल्याचे दिसून आले आहे. या सर्व प्रकरणात एकूण रु.२३,०९,६४९/- इतक्या किंमतीच्या साहित्याचा वाद असल्यामुळे, ही रक्कम संबंधीत अधिकारी यांचेकडून वसूल करण्यात यावी व त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करुन, त्यांना जबर शिक्षा लादण्यात यावी तसेच महापालिका निधीचा गैरवापर व घोटाळा केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द फौजदारी गुन्हाही दाखल करण्यात यावा.

नंदलाल समितीने केलेल्या शिफारसींच्या आधारे, या प्रकरणातील तत्कालीन अतिरिक्त उपायुक्त, तत्कालीन क्रीडा अधिकारी यांना सेवेतून निलंबित करण्यात आले होते. तसेच तत्कालीन अतिरिक्त उपायुक्त आणि तत्कालीन क्रिडा अधिकारी, तत्कालीन शिक्षण अधिकारी, संबंधीत पुरवठादार, तत्कालीन नगरसेवक व इतर खाजगी इसम यांचेविरुध्द भा.द.वि.कलम ४०६, ४०९,४२०,४६७, १२०(ब), ५११ व ३४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, सद्य:स्थितीत सदर प्रकरण मुख्य न्यायदंडाधिकारी, नागपूर यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

******************

रोटा- इला-९६३८ (१५०-३-२०२०)-१

### विधानसभा लक्षवेधी सूचना

सर्वश्री. प्रकाश सुर्वे, रमेश लटके, मंगेश कुडाळकर, प्रकाश फातर्पेकर, अबू आजमी, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे :-

"मकानीपाडा (मालाड पूर्व) मुंबई येथील के.डी. बिल्डर्सने रीहॅब बिल्डिंग-२ ही एसआरए गृहनिर्माण इमारत बांधण्यात येणे, सदर एसआरए योजना राबवितांना तेथे ६ मीटरचा गटारासोबतचा रस्ता तयार करण्यात येणे, वास्तविक पाहता इमारतीची उंची ६९ मीटर असेल तर ९ मीटरचा रस्ता बांधणे आवश्यक असतानाही तसे न करणे, असे असतांनाही या विकासकांने ६ मीटरचा रस्ता तयार करुन मुंबई महानगरपालिकेची व अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र आर्थिक संगनमत करून घेणे, परंतु प्रत्यक्षात विकासकाने बांधलेल्या इमारतीची उंची ७२ मीटर असून याकरिता १२ मीटरचा रस्ता अपेक्षित असतांना तसे न केल्याने परिसरातील नागरिकांनी संबंधित विभागाकडे तक्रार करुनही कोणतीच कारवाई न करणे, यामुळे या परिसरात एखादी दुर्देवी घटना घडल्यास अग्निशमन दलाचे वाहन, अॅम्ब्युलन्स घटनास्थळी पोहचणे कठिण होणे, परिणामी स्थानिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण याबाबत शासनाने तातडीने संबंधित विकासक तसेच महानगरपालिका व अग्निशमन दलाचे अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई, प्रतिक्रिया व भूमिका."

-: मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन :-

मकरानी पाडा, राणी सती मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई येथे झोपडपट्टी पुर्नवसनांतर्गत दोन विंगची इमारत बांधण्यात आली आहे. त्यापैकी एक रीहॅब तळमजला + २३ मजले असून या विंगची उंची ६९.९२ मीटर आहे. विंग-बी सेल असून सदर विंग तळमजला + २२ मजला असून या विंगची उंची ६७.०३ मीटर आहे. सदर इमारतीला झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणामार्फत दिनांक ०१.०१.२०१९ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुंबई अग्निशमन दलामार्फत सदर इमारतीचे आराखडे तपासून दिनांक २९.०९.२०१४ रोजी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. तद्नंतर बांधकाम पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी संबंधित वास्तुविषारदाने अर्ज सादर केला. त्यानुसार खातरजमा करुन दिनांक ०५.११.२०१८ रोजी बांधकाम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

राणी सती मार्गापासून इमारतीपर्यंतचा रस्ता अग्निविमोचन वाहने जाण्यास पुरेसा नसल्याबाबतची तक्रार महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांमार्फत दिनांक २६.०२.२०२० रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली. सदर पाहणीमध्ये, राणी सती मार्ग ते इमारतीपर्यंतचा रस्ता काही ठिकाणी कमीत कमी ५.६० मीटर ते जास्तीत जास्त ११.१० मीटर (तेथील वृक्षाच्या कठड्यासहीत) असल्याचे निर्दशनास आले. सदर रस्त्यावर महानगरपालिकेमार्फत नाल्याचे

रेटा/ए-1586 (750.3-2020) [पृ.मा.प.

काम सुरु असल्यामुळे, काम पुर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या प्रत्यक्ष रुदींची तपासणी करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु, इमारत बांधकामास अग्निप्रतिबंधक व अग्नि सुरक्षा उपाययोजना सुचविणारे ना-हरकत प्रमाणपत्र देते वेळी इमारतीच्या आराखड्यात सदर रस्ता ०९.१० मीटर दर्शविण्यात आला आहे. इमारतीच्या दक्षिणेकडे सध्या सोपडपट्टी असल्यामुळे आराखड्यात दर्शविलेल्या १२.२० मीटर रुंदीचा डी.पी. रोड असल्याचे महानगरपालिकेस आढळून आले नाही.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ च्या तरतुदीनुसार, अग्निसुरक्षा उपाययोजना यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबत सादर करावयाचे 'प्रपत्र ब' इमारतीच्या विकासकाने महानगरपालिकेस सादर केले आहे.

*******

एम-1586-1a

(०४)

<u>नगर विकास विभाग</u>

<u>सन-२०२० चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन</u> <u>लक्षवेधी सूचना</u>

**सर्वश्री. सुनिल प्रभू, राधाकृष्ण विखे-पाटील, अबू आजमी, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"सी होम्स सीवूड्स (नवी मुंबई) पामबीच येथील या इमारतीतील २१ व्या मजल्यावर दिनांक ८ फेब्रुवरी, २०२० रोजी अचानक गॅस सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेली आग, आग विझविण्यास नेरुळ अग्निशमन दलाचे जवान आले असताना फ्लॅटमध्ये असलेल्या गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने अग्निशमन दलाचे ७ जवान गंभीररित्या जखमी होणे, अग्निशमन दलाच्या जवानांनी तब्बल ८ तास अथक प्रयत्न केल्यानंतर आटोक्यात आलेली आग, आग विझविताना गंभीर जखमी झालेल्या अग्निशमन दलाच्या ७ जवानांना एरोली येथील नॅशनल बर्न सेंटर या खाजगी रूग्णालयामध्ये दाखल करण्यास नेण्यात आले असता, आगाऊ शुल्क भरल्याशिवाय कोणत्याही रूग्णास रूग्णालयात दाखल करून घेत नसल्याचे कारण देऊन, जखमी कर्मचाऱ्यांना उपचार करण्याऐवजी, एक-दीड तास ताटकळत ठेवण्यात येणे, नवी मुंबई शहरातील बहुतांश इमारतीमध्ये बसविण्यात आलेल्या आग विझविणारी यंत्रणा बंद असल्याचे अग्निशमन दलाच्या निदर्शनास येणे, अग्निशमन यंत्रणा बंद अवस्थेत असलेल्या ४०० पेक्षा जास्त इमारतींना अग्निशमन विभागाने गेल्या तीन वर्षात पाठविलेल्या नोटीसा यामध्ये एकट्या नेरूळ विभागातील १२२ इमारतींचा असलेला समावेश, खबरदारीच्या उपाययोजनाकडे सोसायटीतील पदाधिकाऱ्यांचे झालेले दुर्लक्ष, याप्रकरणी महानगरपालिकेने संबंधितांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

## <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

दि.०८.०२.२०२० रोजी सीवूड्स (नवी मुंबई) येथील सी होम्स अपार्टमेंट मध्ये सकाळी ६.३० वाजेच्या सुमारास २० व्या व २१ व्या मजल्यावर मोठया प्रमाणात आग लागली होती. त्याअनुषंगाने नेरूळ अग्निशमन केंद्रातील अत्याधुनिक उंच शिडी (६८ मी. उंच) असलेल्या अग्निशमन गाडीच्या मदतीने आग विझविण्यास सुरुवात केली.

पाम बीच रोड साईडला गाडी लावून आग विझवित असताना मागील बाजूस एक छोटासा स्फोट झाल्याने आग पुन्हा पसरली, समोरील बाजूस लागलेली आग विझविल्यानंतर अग्निशमन वाहन मागील बाजूस लावून आग विझविण्यास सुरूवात केली. अग्निशमन अधिकारी व कर्मचारी आग विझविण्यासाठी २० व्या मजल्यावर पोहचले असता, तेथे गॅस सिलेंडरचा मोठा स्फोट झाला व आग जास्त प्रमाणात वाढली.

या स्फोटामध्ये ७ अग्निशमन अधिकारी/जवान यांच्या चेहऱ्याला व हाताला जखमा झाल्या. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना National Burn Hospital, ऐरोली येथे विना विलंब उपचारासाठी दाखल करण्यात आले. रूग्णालयामार्फत त्यांच्या उपचारासाठी कोणत्याही प्रकारची दिरंगाई झालेली नाही. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांच्या उपचाराचा संपूर्ण खर्च संबंधित रूग्णालयाला देण्यात आलेला आहे. एकूण ७ जवानांपैकी ४ जवानांवर किरकोळ जखमा असल्यामुळे त्यांचेवर उपचार करुन दि.११.०२.२०२० रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. ३ जवान जवळपास ६ टक्के भाजले होते. त्यांचेवर उपचार करून त्यांना दि.२७.०२.२०२० रोजी डिस्चार्ज देण्यात आले आहे.

सदर इमारतीची कायमस्वरुपी आग विझविण्याची यंत्रणा कार्यान्वित नसल्याने, सदर इमारतीच्या भोगवटाधारकांवर व सी होम्स को. ऑप. हौ. सोसायटीवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ च्या कलम-३६ नुसार एन. आर. आय. सागरी, पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे दि. २८.०२.२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये मागील ०३ वर्षांमध्ये ४०० पेक्षा जास्त इमारतींची तपासणी करून त्यांना आग प्रतिबंधक यंत्रणेतील त्रुटींची पूर्तता करण्याबाबत नोटीस देण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये नेरुळ विभागातील ११७ इमारतींचा समावेश आहे. त्यांचेवर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ आणि महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना नियम, २००१ अन्वये प्रत्येक इमारतीमधील आग प्रतिबंधक यंत्रणा कार्यान्वित असल्याबाबत शासन मान्यता प्राप्त अनुज्ञप्ती अभिकरणामार्फत (Licensing Agency) विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र नवी मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडे सादर करण्यासाठी वृत्तपत्रांमध्ये जाहिर आवाहन करण्यात आलेले आहे.

********

विधानसभा लक्षवेधी सूचना

सर्वश्री. चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री. सुनिल प्रभू, अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री. पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, सुरेश वरपुडकर, विक्रमसिंह सावंत, चंद्रकांत जाधव, ऋतुराज पाटील, संजय जगताप, विकास ठाकरे, अमित झनक, सुभाष धोटे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. मोहनराव हंबर्डे, बळवंत वानखेडे, राजू पारवे, राजू आवळे, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"मुंबईत आगीचे सत्र सुरुच असून २४ तासांत आगीच्या तीन दुर्घटना घडून १५ जण जखमी झाल्यांचे दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, अंधेरी एमआयडीसी येथील सेस्टा नेट कंपनीच्या सर्व्हर रुमल दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० रोजी आग लागली असणे, सदर इमारतीला काचेचे आवरण असल्याने आग विझवताना अग्निशमन दलाच्या जवानांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, कांदिवली पूर्वेकडील संभाजी नगर मधील एक चाळ तसेच वांद्रा पूर्व येथील एक चाळ या ठिकाणी आगीची दुर्घटना घडणे, मुंबईला दिवसाला सरासरी ११ आगीच्या दुर्घटना घडत असल्याचे अग्निशमन क्षेत्रातील तंज्ञाचे मत असणे, सन २००८ ते २०१८ या काळात येथे ५३,३३३ आगीच्या दुर्घटना घडणे, त्यात ६६६ जणांचा दुदेवी मृत्यु होणे, या मृतांमध्ये २२३ महिला, ४४ पुरुष, ३४ मुले व ५ अग्निशमन दलातील अधिकारी यांचा समावेश असणे, आगीच्या दुर्घटना घडल्यास प्रशासनाकडून त्याचा तपास करुन तात्पुरत्या उपाययोजना केल्या जाणे, ठोस निर्णय घेतला जात नसणे, यामुळे मुंबई मधील अग्नी सुरक्षेचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, परिणामी जनतेत पसरलेला असंतोष याबाबत शासनाने आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**:- <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-**

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील खेरवाडी, गल्ली नं. १०, आंबेडकर नगर, रुम नं. २४१ या ठिकाणी दिनांक १२.०२.२०२० रोजी केरोसीन स्टोव्हचा जास्तीच्या दाबामुळे भडका उडून आग लागली होती. सदर आगीमध्ये ४ स्त्रिया, १ मुलगा व १ मुलगी जखमी झाले होते.

कांदिवली (पूर्व) येथील आकुर्ली रोड, जानुपाडा, गणू गावारे चाळ या ठिकाणी दिनांक १२.०२.२०२० रोजी घरगुती सिलेंडरच्या मेन व्हॉल्व्हमधून गॅस लिकेज होऊन, त्यामुळे जमा झालेल्या गॅसचा संपर्क देव्हाऱ्यातील जळत्या दिव्याच्या ज्योतीबरोबर आल्यामुळे आगीचा भडका उडून आग लागली होती. सदर आगीमध्ये जखमी झालेले ६ पुरुष, २ स्त्रिया व १ मुलगा यांपैकी १ पुरुष व १ स्त्री यांचे उपचारादरम्यान निधन झाले आहे.

अंधेरी (पूर्व) येथील एम.आय.डी.सी. रोड, टॉवर सी, रोल्टा इंडिया लिमिटेड या ठिकाणी दिनांक १३.०२.२०२० रोजी आग लागली होती. सदर इमारत तळमजला + ४ मजले स्वरुपाची काचेची तावदाने असलेली इमारती असून त्यामध्ये वायुविजन नसल्याने काचेची तावदाने तोडून आग विझविण्यात आली. सदर आग विझवितांना अग्निशमन विभागाचा एक अधिकारी व १ यंत्रचालक

*******

यांना किरकोळ दुखापत झाली होती. सदर आगीच्या कारणांचा तपास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी, एमआयडीसी अग्निशमन सेवा व पोलीसांमार्फत सुरु आहे.

मुंबईमध्ये दिवसाला सरासरी १३ ते १४ आगीच्या घटना घडत असल्याचे मागील ३ वर्षांच्या अभिलेखावरुन दिसून येते.

माहे जानेवारी, २००८ ते माहे डिसेंबर, २०१८ या कालावधीमध्ये मुंबईत आगीच्या ५०,५३९ दुर्घटना घडल्या असून, सदर आगींमध्ये १९९ महिला, ३९६ पुरुष व २८ मुले अशा एकूण ६२३ जणांचा मृत्यू झाला आहे. सदर मृतांमध्ये अग्निशमन दलातील ५ अधिकारी/कर्मचारी यांचा समावेश आहे.

मुंबईतील प्रत्येक आगीच्या दुर्घटनांच्या कारणांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत चौकशी करण्यात येऊन, आगीच्या दुर्घटना घडू नये.याकरिता उपाययोजना सुचविल्या जातात. तसेच, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये कारवाई करण्यात येते.

मुंबई अग्निशमन दलामार्फत अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने मुंबई शहरातील इमारतींची महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ अन्वये, सन २०१५ते सन २०१९ या कालावधीत ७१९१ इमारतींची तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये १६७८ इमारतींच्या मालक/भोगवटादारांवर नोटीसा बजावण्यात आल्या असून, त्यापैकी १६०१ इमारतींनी अग्निसुरक्षेच्या त्रुटींची पुर्तता केली आहे व त्रुटींची पुर्तता न केल्यामुळे ४८ इमारतींवर कायदेशीर कारवाई तसेच, २९ इमारतींची जल व विद्युत जोडणी बंद करण्याचे प्रस्ताविण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रत्येक विभाग कार्यालयामध्ये "अग्निसुरक्षा पालन कक्ष" स्थापन करण्यात आला असून, सदर कक्षामध्ये अग्निशमन दल, वैद्यकीय विभाग, अनुज्ञापन विभाग तसेच सहाय्यक अभियंता (इमारत व कारखाने) या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सदर कक्षामार्फत विभाग निहाय आस्थापनांची यादृच्छिक (रॅन्डमली) तपासणी करण्यात येते. त्यानुसार माहे जानेवारी, २०१९ ते माहे जानेवारी, २०२० या कालावधीमध्ये १२,७४३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली असून, सदर कारवाई दरम्यान ११,७६२ एल.पी. गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.

तसेच, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ च्या अंतर्गत येणाऱ्या बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आस्थापनांना अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या मुलभूत उपाययोजना (कोडीफाईड रिक्वायरमेंट्स) महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

आगीच्या दुर्घटना रोखण्याकरिता मुंबई अग्निशमन दलामार्फत जनजागृतीच्या माध्यमातून अग्नि स्वयंसेवक तयार करण्यात येतात. त्यानुसार माहे जानेवारी, २०२० पर्यंत एकूण ६४२६ स्वयंसेवकांना आग प्रतिबंधक उपाययोजना, मुलभूत अग्निशमन व अग्निसुरक्षेचे उपाय यांची माहिती व प्रशिक्षण विनामुल्य देण्यात आले आहे.

*******

विधानसभा लक्षवेधी सूचना

**श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. प्रशांत ठाकूर, ॲड. आशिष शेलार, कॅप्टन आर.तमिल सेल्वन, सर्वश्री. अबू आजमी, रईस शेख, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई महापालिकेच्या इमारतीमध्ये सुरु असलेल्या ९७ रात्रशाळांचे भाडे भरण्यासाठी दिरंगाई होत असल्याने या थकीत भाडयाचा आकडा ६५ लाखांवर पोहचला असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२० च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेच्या परिपत्रकानुसार रात्रशाळांना ५० रुपये प्रति महिना वर्गभाडे आणि एक हजार रुपये कार्यालय भाडे असणे, सन २००८ मध्ये आलेल्या नव्या दरपत्रकानुसार वर्गभाडे ३५० रुपये आणि कार्यालय भाडे एक हजार ८५० रुपये असणे, मात्र दरवर्षी नुतनीकरणाच्या नावाखाली किमान सहा महिने विलंब करीत ५० टक्के दंड व त्यावर १८ टक्के चक्रवाढ दराने व्याज, संगणक भाडे असे मिळून महिना तब्बल ७५ हजार रुपये भाडे आकारले जाणे, या रात्रशाळांना सन २०१२ पासून अनुदान बंद केल्याने शिक्षक स्वखर्चाने शाळा चालवित असणे, चार तास चालणाऱ्या शाळांना सात तासांचे निकष लावण्यात आल्याने लाखो रुपयांची थकबाकी होणे, त्यामुळे रात्रशाळांच्या शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यामुळे रात्रशाळांना आकारण्यात आलेली सर्व भाडे माफ करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

-: <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-

बृहन्मुंबई महापालिकेच्या इमारतीमध्ये सद्यस्थितीत १०२ रात्रशाळा कार्यरत असून त्यापैकी ३१ रात्रशाळांचे सन २०१९ पर्यंत अंदाजे रुपये २६ लाख इतके भाडे थकीत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका शाळेच्या इमारतींमधील रिक्त वर्गखोल्या रात्रशाळांकरीता उपलब्ध करुन देण्याकरीता सन २००० च्या धोरणानुसार रुपये १८०/- इतके शुल्क आकारणी करण्यात येत होती. तद्नंतर, सन २००७ च्या धोरणानुसार रुपये १००/- व सन २००८ च्या धोरणानुसार रुपये ५०/- इतके शुल्क आकारण्याचे निश्चित करण्यात आले. सद्य:स्थितीत, रात्रशाळांकडून रुपये ५०/- एवढे नाममात्र शुल्क आकारण्यात येत आहे.

रात्रशाळेने संगणक व कार्यालयाच्या खोलीचा पूर्ण वेळ वापर केला केल्यास, रुपये १०००/- एवढे शुल्क आकारले जाते. तसेच रात्रशाळांकडून विद्युत बील, संगणकीय शुल्क, जी.एस.टी (सेवा शुल्क) आकारण्यात येत नाही.

रात्रशाळेच्या नुतनीकरणाचा अर्ज दिनांक १५ डिसेंबर पूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. दिनांक ३० जून पर्यंत संस्थेने नुतनीकरण केल्यास भरपाई शुल्कासह १० टक्के दंडात्मक रक्कम आकारण्यात येते.

सन २०१५ मध्ये मा.लोकप्रतिनिधींनी रात्रशाळांची मागील १० वर्षाची सर्व थकबाकी माफ करणेबाबत केलेल्या विनंतीनुसार, रात्रशाळांचे माहे एपिल, २००० ते माहे मार्च, २००७ या कालावधीतील थकीत शुल्क माफ करण्यात आले आहे. माहे एप्रिल, २००७ नंतरचे प्रलंबित शुल्क वसुल करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०३.०५.२०११ व दिनांक ०७.०२.२०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार दरवर्षी १ एप्रिल पासून विद्यमान शुल्क सुचीतील दरामध्ये १०% म्हणजेच साधारणतः रुपये ५/- इतकी वाढ करुन शुल्क आकारणी करण्यात येत आहे.

रोटा /एच - 1566 (50-3-2020) *******

~~CR-171_2020_BMC_C_01~~

(७८)

<u>सन-२०२० चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन</u> <u>लक्षवेधी सूचना</u>

**सर्वश्री. सुनिल प्रभू, अबू आजमी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"जि. ठाणे मुरबाड येथील नैतिकतेचे तसेच मुल्य शिक्षणाचे धडे देणाऱ्या पाच शिक्षकांनी दिव्यांगाचे बोगस दाखले देऊन कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या शाळेमध्ये शिक्षण सेवक पदावर बेकायदा नियुक्ती मिळविल्याचा प्रकार प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिनांक ११.२.२०२० रोजी उघडकीस आणणे, सदरहू पाच शिक्षकांनी दिव्यांगाचे बोगस दाखले, दस्ताऐवज तयार करून खुला प्रवर्ग समांतर आरक्षण अंध-अपंग या प्रवर्गातून करण्यात येणे, सदरहू पाच पैकी चार शिक्षकांनी अल्पदृष्टी तर एकाला अस्तीव्यंग असल्याचे कागदपत्रे व दाखल्यामध्ये नमुद करण्यात येणे, शिक्षक भरतीच्या वेळी सादर केलेले दाखले अवैध ठरल्यास कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द करण्यात येईल असे महापालिकेच्या आदेशात स्पष्टपणे नमुद केले असतानाही सदरहू पाच शिक्षकांचे दिव्यांगाचे दाखले पडताळणीसाठी दिनांक २३.१२.२०१९ रोजी संभाजीनगर सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात येणे, परंतु, अद्याप त्याचा अहवाल प्राप्त न झाल्याचे सांगून पाच बोगस नियुक्ती मिळविलेल्या शिक्षकांना कारवाईपासून वाचविण्यासाठी शासनाचे संबंधित अधिकारी नियमबाह्यरित्या मदत करित असल्याचे आढळून येणे, सदर बोगस शिक्षकांच्या भरतीमुळे शिक्षण क्षेत्रात व्यक्त होत असलेला संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

<u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u>

शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील दि.१८.०३.२०१६ च्या पत्रान्वये समांतर आरक्षण अंतर्गत नियुक्तीकरीता एकूण ५ शिक्षकांची कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस शिफारस करण्यात आली. त्यास अनुसरून ४ अल्पदृष्टी व १ अस्थिव्यंग अशा एकूण ५ शिक्षकांना कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शाळांमध्ये नियुक्ती देण्यात आलेली आहे.

सदरहू शिक्षकांनी सादर केलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र बोगस असल्याची तक्रार प्रहार मुरबाड तालुका या संघटनेकडून महानगरपालिकेस प्राप्त झाली. सदर प्राप्त तक्रारीची दखल घेवून जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद यांचेकडे दि.२३.१२.२०१९ व दि.१४.०२.२०२० तसेच अधिक्षक शासकीय वैद्यकिय रुग्णालय व महाविद्यालय औरंगाबाद यांचेकडे दि.२४.०१.२०२० रोजी पत्रव्यवहार करुन अपंगत्व प्रमाणपत्राची पडताळणी करुन मिळणेची विनंती करण्यात आलेली आहे. तथापि, त्यांचे कार्यालयाकडून अद्याप पडताळणी केलेली प्रमाणपत्रे प्राप्त झालेले नाहीत.

सदर तक्रारीबाबत नि:पक्षपातीपणे कार्यवाही होण्याच्या दृष्टीने उपरोक्त नमूद ५ अपंग शिक्षकांची व्यक्तीश: फेर तपासणी करणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय ठाणे यांना दि.३१.०१.२०२० रोजी पत्र देण्यात आले आहे. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा सामान्य रूग्णालय, ठाणे यांनी सदर ५ शिक्षकांची तपासणी केली असून संपूर्ण अपंगत्वाची तपासणी करण्यासाठी अधिष्ठाता, सर जी जी समुह रुग्णालय भायखळा यांना दि.१३.०२.२०२० व दि.२०.०२.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. सर ज.जी. समुह रुग्णालय भायखळा मुंबई यांचेकडून अहवाल प्राप्त झाल्यावर संबंधित शिक्षकांबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

********

रोटा/एच १६२१ [८००-३-२०२०]·

विधानसभा लक्षवेधी सूचना

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबईतील मालाड पूर्व दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील हुमेरा पार्क दिंडोशी येथील अरुंद रस्त्याचे रुंदीकरणाचे विकासकाम बाधीत ८२ झोपडीधारकांचे अन्यत्र पुनर्वसन करुन सुरु करणेबाबत महापालिका व एमएमआरडीए यांच्या संयुक्त विद्यमाने तीन महिन्यात सुरु करणेकरिता सन २०१६ मध्ये तत्कालीन राज्यमंत्री नगरविकास यांनी आश्वासन देऊनही अद्याप यावर कोणतीही कार्यवाही न करणे, तसेच कुरार गावातील वाहतुक कोंडी समस्या सोडविण्यासाठी अडसर ठरलेल्या रस्त्यातील बाधीत ३०० झोपड्यांचे अन्यत्र पुनर्वसन करुन लक्ष्मणनगर ते संस्कार कॉलेज जवळील प्रस्तावित रस्ता वाहतुकीसाठी खुला करणेबाबत शासनास अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, तसेच मालाड पूर्व-पश्चिम द्रुतगती महामार्गाखालून मालाड रेल्वे स्थानक ते आप्पा पाडा रस्त्याला सलग जोडणाऱ्या पुष्पापार्क पादचारी भुयारी मार्गाचे काम सन २०१७ पासून मेट्रो क्र. ७ च्या विकासकामासाठी १५ कोटी रुपये निधी मंजूर करण्यात येऊन सदरचे काम खुपच संथ गतीने सुरु असल्याने नागरीकांची रहदारीसाठी खुपच गैरसोय होत असणे, तसेच मालाड जलाशय टेकडी मार्ग ते कांदिवली लोखंडवाला संकुलास जोडणाऱ्या रस्त्यामधील वन विभागाच्या हद्दीत येत असलेल्या ४०० मिटर रस्त्याचे काम ना हरकत प्रमाणपत्र अभावी अद्याप प्रलंबित असणे, तसेच गोरेगांव-मुलुंड लिंक रोडचे विकासकामासाठी महापालिकेने अर्थसंकल्पात निधी मंजूर करुनही सदरहू उड्डाणपूल व रस्तारुंदीकरणाचे काम अद्यापही सुरु करण्यात न येणे, या समस्यांबाबत शासन, मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए या संस्थांकडून विकासकाम करणेबाबत दुर्लक्ष झाल्यामुळे वाहतुक कोंडी आणि या परिसरातील नागरीकांची रहदारीसाठी होत असलेली प्रचंड गैरसोय, याकडे झालेले शासनाचे दुर्लक्ष, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

-: <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिंडोशी, मालाड (पूर्व) येथील हुमेरा पार्क ते ए.के.वैद्य रस्ता रुंदीकरणामध्ये, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाने बाधीत झोपड्या वगळून २१ बांधकामांची पात्रता यादी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत समाविष्ट करण्यासाठी कार्यकारी अभियंता (झोपडपट्टी पुनर्वसन योजना) यांना परिशिष्टाची मूळ प्रत महानगरपालिकेमार्फत दिनांक १८.०७.२०१६ रोजी पाठविण्यात आलेली आहे.

लक्ष्मण नगर ते संस्कार कॉलेज येथे १८.३० मी. विकास नियोजन रस्ता असून त्यामध्ये १४५ झोपडया बाधित होत आहेत. सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत सदर ठिकाणचा स्थळदर्शक नकाशा तयार करुन बाधित झोपडीधारकांचे सीमांकन करण्यात आले असून त्यांना कागदोपत्री पुरावे सादर

करण्यासाठी नोटीस देण्यात आल्या आहे. त्यानुषंगाने प्राप्त दस्ताऐवजांची छाननी करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत प्रगतीपथावर आहे.

मलाड पूर्व-पश्चिम द्रुतगती महामार्गाखालून मालाड रेल्वे स्थानक ते आप्पा पाडा रस्त्याला सलग जोडणाऱ्या पुष्पापार्क पादचारी भूयारी मार्गाचे रुंदीकरण करुन त्याचे रुपांतर वाहन भुयारी मार्गात करण्याच्या कामास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत (एम.एम.आर.डी.ए.) दिनांक २६.१२.२०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत पश्चिम द्रुतगती महामार्गावर मेट्रो मार्ग क्रमांक ७ चे काम प्रगतीपथावर आहे. भूयारी मार्गाच्या पहिल्या टप्प्याच्या कामास वाहतूक परवानगी मिळाली परंतु मेट्रो मार्गाचे काम प्रथम प्राधान्य देवून करणे आवश्यक होते. पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वर्दळीची तीव्रता, सततच्या वाहतूक वर्दळीमुळे कामाच्या गतीवर येणाऱ्या मर्यादा, वाहतूक सुरक्षेस प्राधान्य देण्याच्या धोरणामुळे कामावर होणारा परिणाम आणि मेट्रो कामामुळे भूयारी मार्गाच्या कामाच्या नियोजित वेळापत्रकात येणारे अडथळे या सर्व बाबींमुळे भूयारी मार्गाचे काम करण्यास विलंब होत आहे. तथापी, भूयारी मार्गाच्या टप्पा १ मधील कामे माहे मे, २०२० अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित असल्याचे एम.एम.आर.डी.ए.ने कळविले आहे.

मालाड हिल रिजरवायर ते आप्पापाडा (आर/ दक्षिण विभाग हद्दी पर्यंत) व लोखंडवाला संकुलास जोडणारा ३६.६० मी. रुंद व अंदाजे १४०० मी. लांबीचा विकास नियोजन रस्ता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकसित करण्याचे प्रस्तावित आहे. परंतु सदर रस्त्यामधील अंदाजित ७५० मी. रस्ता वन क्षेत्रातून जात असून २७० मी. लांबीच्या रस्त्याचे क्षेत्र जिल्हाधिकारी (मुंबई उपनगर) यांचे अधिपत्याखाली आहे. तसेच सदर रस्त्यांचे संरेखन अंदाजे १५०० ते २००० झोपड्यांनी बाधित आहे.

वन विभागाच्या अधिपत्याखालील ७५० मी. लांबीचा रस्ता विकसित करण्याकरिता वन संवर्धन अधिनियम, १९८० च्या तरतुदींनुसार केंद्र शासनाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. सदर परवानगी प्राप्त करण्याच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची पुर्तता करुन केंद्र शासनाच्या वन विभागास प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

सदर रस्त्याचे रेखांकन, अंदाजपत्रक आराखडा व योजना तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली असून, सल्लागाराकडून रस्त्यामधील बाधीत क्षेत्राचे भूगोल सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. सदर सर्वेक्षणानुसार ७५० मी. रस्ता संजय गांधी राष्ट्रीय उद्यान मधून जात

असून, उर्वरित भाग आप्पापाडा व क्रांतीनगर झोपडपट्टीने बाधित आहे. तसेच संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या भागामध्ये पूल (उन्नत रस्ता) बांधून व उर्वरित रस्ता करण्याचे प्रस्तावित आहे.

सदर पूल व रस्त्याच्या संपूर्ण बांधकामाकरिता सल्लागाराकडून रु. ४५०.०० कोटी खर्चाचा ढोबळ अंदाज व चार वर्ष कालावधी देण्यात आला आहे. तसेच सल्लागाराकडून इतर आवश्यक रेखांकन, अंदाजपत्रक, आराखडा, योजना व निविदा इ. प्राप्त झाल्यानंतर छाननी करुन रोड व पुलाकरिता एकत्रित निविदा मागविण्यासाठी प्रशासकीय मान्यता व इतर संबंधित कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

गोरेगांव - मुलुंड लिंक रोडच्या रस्ता रुंदीकरणाचे काम माहे ऑक्टोंबर २०१८ पासून सुरु झाले असून त्याअंतर्गत पश्चिम द्रुतगती मार्ग ते चित्र नगरी प्रवेश द्वार तसेच पूर्व द्रुतगती मार्ग ते तानसा पाईपलाईन पर्यंतच्या कामाचा समावेश आहे. सदर रस्ता रुंदीकरणाच्या कामाचा कालावधी मार्च २०२१ पर्यंत आहे. या कामामध्ये, सद्यस्थितीत अस्तित्वात असलेला रस्ता ४५.७० मीटर पर्यंत रुंद करण्यात येणार आहे.

सदर रस्ता रुंदीकरणात एकूण २३७ झोपडया / गाळे बाधित होत असून त्यापैकी पात्र झोपडया/गाळेधारकांचे पुनर्वसन करुन रस्ता मोकळा करण्याची प्रक्रीया महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

गोरेगांव - मुलुंड लिंक रोड प्रकल्पाअंतर्गत रत्नागिरी हॉटेल जवळील चौकातील उड्डाणपूल, तानसा पाईप लाईन ते नाहूर स्टेशन येथील उड्डाणपूल आणि अमर नगर मुलूंड येथील वर्तुळाकार उड्डाणपुल यांच्या कामाकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पात्र कंत्राटदारांकडून प्रस्ताव मागविण्याची कार्यवाही सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

*******

ऊर्जा - 1587 - 2

07

श्री. चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. लक्ष्मण जगताप, राम सातपुते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई महानगरपालिकेच्या तब्बल ३७ कंत्राटदारांच्या कार्यालयात माहे नोव्हेंबर २०१९ मध्ये आयकर विभागाने टाकलेल्या छाप्यांमध्ये प्रथमदर्शनी रुपये ७८५ कोटीची बेनामी मालमत्ता आढळून येणे, तसेच रस्ते व दुरुस्तीच्या कामांत शेकडो कोटींचा गैरव्यवहार झाल्याचेही निदर्शनास येणे, बनावट कंपन्या काढून त्यांच्यासोबत समभाग विक्री दाखवून पैसा वळवणे, बनावट व्यवहार देयके तयार करुन कामात गैरव्यवहार करणे, कर चोरी करणे, हवालामार्फत बाहेरच्या देशात पैसा पाठविणे, मनी लॉड्रींग, असे असंख्य गैरप्रकार केल्याचे निदर्शनास येणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करुन यात गुंतलेल्या सर्व संबंधीत व्यक्ती, कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

-: <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-

बृहन्मुंबई महानगरपालिकेत २०१२ पासून दुरुस्ती व विकासकामे केलेल्या रस्त्यांच्या अनियमिततेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली. सदर चौकशी समितीने पहिल्या टप्यात ३४ रस्त्यांच्या अहवाल सादर केल्यानंतर महानगरपालिकेने "मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस - आर.के. मधानी ऍण्ड कंपनी (जे.व्ही.), मे. आर. के. मधानी ऍण्ड कंपनी, मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड, मे. महावीर रोड्स ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि., मे. जे. कुमार - के आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) व मे. आर. पी. इस. इन्फ्राप्रोजेक्टस - के.आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.)" या ०६ कंत्राटदार आणि मे. इंडीयन रजिस्टर ऑफ शिपिंग व मे. एस.जी. एस. इंडीया प्रा. लि. या ०२ त्रयस्थ लेखापरिक्षक विरुध्द आझाद मैदान पोलीस स्टेशन येथे दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी FIR दाखल करण्यात आला आहे.

रस्ते दुरुस्ती / पुनर्बांधणी (विकासकामे) चौकशी फेज- I अंतर्गत मे. जे. कुमार - के.आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.), मे. आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस - के आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) हे कंत्राटदार व मे. इंडीयन रजिस्टर ऑफ शिपिंग, मे. एस.जी.एस. इंडीया प्रा. लि. या त्रयस्थ लेखापरिक्षक यांना महानगरपालिकेमार्फत सात वर्षांकरीता काळ्या यादीत टाकण्यात आले.

तथापि यापैकी मे. जे. कुमार - के. आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.), मे.आर.पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस - के.आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) यांनी सदर आदेशाविरुध्द कंत्राटदार नोंदणी नियमावली २०१५ नुसार अपील केले असता मे. जे. कुमार - के. आर कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) यांच्या अपिलासंबंधीचे अपिलिय प्राधिकारी, अतिरिक्त आयुक्त (पश्चिम उपनगरे), बृहन्मुंबई महानगरपालिका व मे. आर.पी. एस. इन्फ्राप्रोजेक्टस - के आर. कन्स्ट्रक्शनस (जे.व्ही.) यांचे अपिलासंबंधीचे अपिलिय प्राधिकारी अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प), बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी कंत्राटदार नोंदणी नियमावली २०१५ मधील तरतूदीनुसार सदर कंत्राटदारांची कायदेशीर सुनावणी प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अंतिम अपिलिय आदेशान्वये सदर कंत्राटदारांची काळया यादीत टाकण्याची शिक्षा तीन वर्षे करण्यात आलेली आहे व

शेटा/एम - 1585 (750-3-2020) पु.मा.प.

याव्यतिरिक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे. जे. कुमार - के. आर. कन्स्ट्रक्शन (जे.व्ही.) यांचेवर अनियमिततेच्या रक्कमेच्या १० टक्के इतका म्हणजेच रु.७२.१० लाख दंड आकारण्यात आलेला आहे.

तसेच फेज-१ अंतर्गत मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस - आर. के. मधानी एण्ड कंपनी (जे.व्ही) यांना चार वर्षाकरीता, मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लिमिटेड यांना तीन वर्षांकरीता व आर. के. मधानी ऍण्ड कंपनी व मे. महावीर रोडस ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना प्रत्येकी दोन वर्षांकरीता त्यांच्या महापालिकेतील नोंदणी वर्ग - १ (A) ऐवजी वर्ग-II मध्ये पदावनत करण्यात आले. मात्र सदर पदावनती आदेशांस तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी स्थगिती देऊन या पदावनत कंत्राटदारांसंबंधी रस्ते दुरुस्ती / पुनर्बांधणी (विकासकामे) चौकशी फेज-I व फेज-II यांचेबाबत एकत्र आदेश देण्याचे निर्देश दिले. तथापि उपरोक्त पदावनत कंत्राटदारांचा चौकशीच्या दोन्ही फेजमध्ये सहभाग असल्याने स्थगिती आदेशांबाबत महा अधिवक्ता यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत व ते प्राप्त झाले आहेत व त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच रस्ते दुरूस्ती/ पुनर्बांधणी (विकासकामे) चौकशी फेज-II अंतर्गत एकूण दोनशे रस्त्यांच्या कामातील अनियमितता गैरव्यवहार प्रकरणी चौकशी पूर्ण करण्यात आलेली आहे व त्यामधील संबंधित "मे. रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्टस लि., मे.महावीर रोड्स ऍण्ड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि., मे.आर.के.मधानी ऍण्ड कंपनी, आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि., मे. जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्टस लि., मे.के.आर.कन्स्ट्रक्शन, मे. सुप्रीम इन्फ्राप्रोजेक्टस इंडिया लि., मे. प्रकाश इंजिनिअर्स एण्ड इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि., मे. न्यु इंडिया रोडवेज, मे. प्रीती कन्स्ट्रक्शन व मे. वितराग कन्स्ट्रक्शन" या ११ कंत्राटदार आणि मे. इंडियन रजिस्टर ऑफ शिपिंग व मे. एस.जी.एस. इंडिया प्रा.लि." या २ त्रयस्थ लेखा परीक्षक यांच्यावर कंत्राटदार नोंदणी नियमावली - २०१५ नुसार अद्ययावत काळ्या यादीत टाकण्याच्या प्रक्रीयेअंतर्गत कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत व त्यासंबंधी सुनावणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे सदर कंत्राटदार व त्रयस्थ लेखापरीक्षक यांची महानगरपालिकेतील नोंदणी तात्पुरी रद्द करण्यात आली असल्याने त्यांना निविदा अंतर्भुत प्रक्रीयेपासून प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे.

तसेच संचालक (अ.से.व प्र.) यांच्या दिनांक ०२.११.२०१९ रोजीच्या आदेशान्वये फेज-II मधील मेसर्स रेलकॉन व आर.के. माधानी (संयुक्त भागीदार Joint Venture) तसेच मेसर्स रेलकॉन इन्फ्राप्रोजेक्ट लि. व मेसर्स आर.के. मधानी यांना पाच वर्षांसाठी काळया यादीत टाकण्यात आलेले आहे व उर्वरित कंत्राटदारावर अंतिम आदेश बजावण्याची प्रक्रिया बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये आयकर विभागामार्फत छापे टाकण्यात येणे, आयकर विभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये प्रथमदर्शनी ७८५ कोटीची बेनामी मालमत्ता आढळून येणे व इतर तत्सम बाबी हे केंद्र सरकारच्या आयकर विभागाशी संबंधित आहेत.

एच - १५८५ - १२

*******

(३)

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्प) अधिवेशन

**श्री.नरेंद्र भोंडेकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणे आहे:-**

**"ठाणे महानगरपालिका येथे सन २०१४ ते २०१९ या दरम्यान बिंदु नामावलीतील दिशा-निर्देशाप्रमाणे मागासवर्गीयांच्या पदोन्नत्या केल्या नसुन त्या पदोन्नत्या नियमबाह्य पध्दतिने केल्याने, पात्र पदोन्नतीधारक अधिकाऱ्यांवर अन्याय होणे, त्या अधिकाऱ्यांना गैरकायदेशीर ईतर अन्य पदांचे अतिरीक्त कार्यभार सोपविणे, डी.पी.सी. अहवालानुसार गंभीर आरोपात निलंबित असणे, त्यांना अद्यापपर्यंत महत्वाच्या पदावरील जबाबदारीवर कायम ठेवणे, तसेच मागासवर्गीय प्रवर्गासाठी असलेल्या संविधानिक रोष्टर प्रणालीमध्ये खुल्या प्रवर्गातील अधिकाऱ्यांच्या नेमणूका करून पात्र मागासवर्गीय अधिकाऱ्यांना डावलणे, या गैरप्रकरणात मोठ्या प्रमाणात उपायुक्त मुख्यालय तसेच तत्कालीन उपायुक्त, यांनी अर्थपुर्ण व्यवहार करून हा गैरप्रकार करणे, या प्रकरणात पात्र अधिकाऱ्यांवर अन्याय झाल्याने त्यांना त्यांचे मुलभूत अधिकारांपासून वंचित ठेवल्याने संविधानातील तरतुदीच्या अधिकारांचा दुरपयोग केला असल्या या गंभीर गैर प्रकरणाची सखोल चौकशीची नितांत आवश्यकता परिणामी पात्र पदोन्नती धारकांवर अन्याय झाल्याने त्यांच्यात निर्माण झालेली असंतोषाची भावना, सदर प्रकरणाची सखोल चौकशीसाठी उच्च स्तरीय समिती गठीत करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रीया"**

### मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन

ठाणे महानगरपालिकेची स्थापना दिनांक ०१.१०.१९८२ मध्ये झाली आहे. ठाणे महानगरपालिका ही "ब" वर्ग महानगरपालिका असून त्यांच्या आस्थापनेवर ३०० पेक्षा जास्त संवर्गात सध्या ७०६६ पदे कार्यरत आहेत. या सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे आस्थापना विषयक कामकाज, भरती करणे, सेवा जेष्ठता ठेवणे, पदोन्नतीचे कामकाज, सेवानिवृत्ती, इ. बाबी उपायुक्त (मुख्यालय), ठाणे महानगरपालिका यांच्या कार्यालयामार्फत हाताळल्या जातात.

ठाणे महानगरपालिकेने कळविल्यानुसार त्यांच्या आस्थापनेवरील सन २०१४ ते सन २०१९ या कालावधीत वर्ग-१ च्या ३३, वर्ग-२ च्या ८७, वर्ग-३ च्या १५६, वर्ग-४ च्या ७३ अशा सुमारे ३३० अधिकारी/कर्मचारी यांच्या पदोन्नत्या करण्यात आल्या आहेत. शासनाने पदोन्नतीसंदर्भात विहित केलेल्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी महापालिका प्रशासनामार्फत केली जाते. ठाणे महानगरपालिकेमध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या अंतर्गत स्वतंत्र मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात आला असून सदर कक्षामार्फत बिंदु नामावलीच्या संवर्गाची नोंदवही अर्थात रोष्टर अद्ययावत करण्याचे काम हाताळले जाते. सदर नोंदवह्यांची तपासणी विभागीय आयुक्त, कोंकण भवन यांच्या कार्यालयाच्या वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांमार्फत केली जाते व तपासणी अंती प्रपत्र-ड मध्ये मागासवर्गीय बिंदुंवर खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांची नेमणुक झाली नसल्याचा दाखला प्रत्येक संवर्गासाठी सादर केला जातो. दरम्यान, वर्ग-१ व वर्ग-२ यांच्या रोष्टरची तपासणी माहे मे, २०१७ मध्ये करण्यात आली असून वर्ग-३ व वर्ग-४ च्या रोष्टर तपासणीसाठी आवश्यक तपशिल विभागीय

रोटा/छ्य-१५७५(७५०-३-२०२०) (क्र-मा-प.

आयुक्त, कोंकण भवन यांच्याकडे ठाणे महानगरपालिकेने सादर केला आहे. ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदोन्नत्या देताना मागासवर्गीय कक्षाकडील बिंदुनामावली नोंदवहीतील आरक्षणाबाबतचा अहवाल, विभागीय पदोन्नती समिती अर्थात डी.पी.सी. च्या शिफारशींच्या आधारे पात्र अधिकारी/कर्मचारी यांचा पदोन्नतीकरीता विचार करण्यात येतो.

ठाणे महानगरपालिकेच्या विभागीय पदोन्नती समितीमध्ये अतिरिक्त आयुक्त हे अध्यक्ष असून उपायुक्त (मुख्यालय), मुख्य लेखापरिक्षक, संबंधित विभागाचे प्रमुख यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. या समितीत मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या प्रतिनिधीला देखील सदस्यत्व देण्यात आले आहे. सदर समिती आरक्षण अनुशेष दर्शविणाऱ्या बिंदुनामावलीनुसार पदोन्नतीमध्ये उपलब्ध होत असलेली आरक्षण निहाय पदे व पदोन्नती देण्यात आलेल्या पदसंख्या विचारात घेऊन कार्यवाही करीत असते.

मा.सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय यांनी पदोन्नतीच्या अनुषंगाने दिलेले निर्णय/आदेश यांचे पालन पदोन्नती देण्याच्या कार्यवाहीत ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेमार्फत वेळोवेळी करण्यात येत असते. ठाणे महानगरपालिकेच्या मान्यता प्राप्त म्युनिसिपल लेबर युनियन ने कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीबाबत विशेषत: अभियंता संवर्गाच्या पदोन्नतीबाबत तक्रार/ निवेदन अलीकडील काही वर्षात सादर केले नसल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार सोपविताना प्रशासकीय निकड, कामाचा उरक, नागरी विकास कामे जलद गतीने पुर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून देण्याची प्रथा असून सदर सर्व निर्णय महानगरपालिकेच्या वरिष्ठ स्तरावर घेतले जातात. ठाणे महानगरपालिकेतील आस्थापनेचे प्रचंड कामकाज लक्षात घेता बदल्या, पदोन्नती किंवा तत्सम आस्थापना विषय बाबींमध्ये त्रुटी राहणे, तक्रारी उद्भवणे या स्वाभाविक बाबी असून अशा स्वरुपाच्या तक्रारींकरीता वेळोवेळी दाद मागण्याची मुभा संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना आहे.

तथापि, ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पात्र अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीचा लाभ देताना काही त्रुटी राहिली असल्यास त्यात आवश्यक त्या सर्व उपाययोजना सूचविण्यासाठी तसेच या प्रक्रियेत मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नती देताना शासनाने विहित केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे केली जात आहे, याची दक्षता घेणे आवश्यक असून त्याकरीता अशा प्रकारच्या पदोन्नतीविषयक तक्रारी शासन स्तरावर प्राप्त झाल्यास त्याविषयी शासनाने विहित केलेल्या पदोन्नती व बिंदु नामवली संवर्ग नोंदवही अद्यावत करण्याविषयक मार्गदर्शक सूचनांनुसार नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिका यांना देण्यात येतील.

*********

एच-१५७५-१क

८६

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२० चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

**सर्वश्री.सुनिल प्रभू, प्रकाश फातर्पेकर, रमेश कोरगांवकर, अजय चौधरी, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

**"नागपूर महापालिकेच्या नियोजन शुन्य कारभारामुळे झालेल्या व चालु असलेल्या योजनांच्या कामांचे देय ५०० ते ८०० कोटीची देयके थकित असल्याचा धक्कादायक प्रकार नुकताच दि.२.३.२०२० रोजी उघडकीस येणे, गेली ५ वर्षापासून शासनाच्या अनेक योजनामधील महापालिकेचा हिस्सा न दिल्यामुळे ५ वर्षांच्या योजनांची कामे ८ ते १० वर्षातही पुर्ण करण्यात न येणे, नागपूर महापालिकेने स्वत:कडे निधी उपलब्ध नसतानाही अर्थसंकल्पात निधी प्रस्तावित करुन जास्त प्रमाणात कामे मंजूर करण्यात येणे, सदर प्रकरणात कोट्यावधी रुपयाची देयके थकीत असून वैधानिक व लिगल देयके महापालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या जीपीएफ, पेन्शन फंड इत्यादी देयकातून वजावट करुन देयके कंत्राटदारांना देण्यात येणे, यामुळे कर्मचाऱ्यांचा पैसा कंत्राटदारांला देण्याचा नागपूर महापालिकेने कायद्याने गुन्हा केला असणे, यामुळे अद्यापही झालेल्या व चालु असलेल्या कामांचे देय रक्कम देणे बाकी असताना नविन कामे घेऊन करोडो रुपयांची नव्याने दायित्व निर्माण करण्यात येणे, शासनाच्या अनेक योजनांमधील महापालिकेचा हिस्सा न दिल्यामुळे अनेक कामे खोळंबली असून आर्थिक आणिबाणी निर्माण झाल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी नागपूर महापालिकेची अर्थव्यवस्था कोलमडून जाऊन डबघाईस आली असल्याने शासनाने नागपूर महापालिका तात्काळ बरखास्त करण्याचे आदेश देण्याची नितांत आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागपूर शहरातील जनतेस मुलभूत नागरी सोईसुविधा आणि विकास कामांपासून वंचित रहावे लागल्याने त्यांच्यात पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."**

---

## मा.मंत्री (नगरविकास) यांचे निवेदन

नागपूर महानगरपालिकेच्या मुख्य उत्पन्नाच्या स्त्रोतापैकी "जकात कर" हा एक होता. सदरचा कर सन २०१३ मध्ये बंद होऊन, एलबीटी आला आणि त्यानंतर एलबीटी बंद होऊन, जीएसटी हा कर लागू करण्यात आला. या सर्व प्रक्रियेदरम्यान, ज्या प्रमाणात महापालिकेस उत्पन्न मिळणे अपेक्षीत होते ते मिळाले नाही. त्याचवेळी नागपूर महानगरपालिका शहर हद्दीत मागील कांही वर्षात केंद्र शासन/राज्य शासन/ महापालिका यांच्या माध्यमातून अनेक मोठी विकासाची आणि मुलभूत सोयीसुविधांची कामे मोठ्या प्रमाणात सुरु झाली. यातील कांही कामे पुर्णत्वाकडे आलेली असून, कांही कामे सुरु झालेली आहेत. ही कामे सुरु करीत असताना, महापालिकेच्या स्तरावरही विकासाची परंतु गरजेची असलेली कामे केलेली आहेत. तसेच अर्थसंकल्पीय उत्पन्नाचे उद्दिष्ट व साध्य यातील तफावतीमुळे देखील महापालिकेच्या उत्पन्नात घट झाली असून, आणि मागील कांही वर्षातील या कामांमुळे महापालिकेच्या तिजोरीवर भार आला आहे, ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही.

नागपूर शहरात, शहर विकासाच्या दृष्टीकोनातून मागील कांही वर्षात मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या विकासकामामुळे महापालिकेच्या तिजोरीवर आजअखेर रु.७००.५५ कोटीचे दायित्व निर्माण झालेले असून, नागपूर मेट्रो रेल्वे साठी महापालिकेच्या हिश्श्याची असलेली रु.३६७.३७ कोटी अद्याप देणे बाकी आहे, तर महापालिकेच्या कायदेशीर देण्यापोटी, कर्मचाऱ्यांच्या जीपीएफ, पेंशन फंड यापोटी रक्कम रु.३६७.९६ कोटीची दायित्व आहे. यातील विकासकामांमधील पाणीपुरवठा योजना आणि सिमेंट रस्ते या महत्वाच्या प्रकल्पामध्ये महापालिकेचा मोठा हिस्सा असून, महापालिकेच्या हिस्स्याअभावी सदरचे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. तसेच, या

(कृ.मा.प.

रोरा-प,च-१६३९ (७५०-३-२०२०)-१

विकासकामांच्या प्रकल्पातील स्वहिस्सा भरण्यासाठी महापालिकेने बँकेकडून व इतर वित्तीय संस्थांकडून रु.५७६.५० कोटी इतके दिर्घ मुदतीचे कर्ज घेतले आहे.

महानगरपालिकेच्या सन २०१४-२०१५ ते सन २०१८-२०१९ या पाच वर्षाच्या मंजूर अर्थसंकल्पाचे अवलोकन केले असता, हे अर्थसंकल्प सरासरी १९.६५% तुटीचे सादर केलेले दिसून येतात. या पार्श्वभूमीवर, महापालिकेने, मागील अपूर्ण कामे व प्रलंबित देयकांचा विचार करुन कामनिहाय तरतूद करणे, विभागनिहाय प्रलंबित देण्यांचा विचार करुन, अर्थसंकल्पीय जमा-खर्च प्रस्तावित करणे, जमा-खर्चाचा ताळमेळ ठेवूनच नवीन विकास कामांना मान्यता देणे, निधी उपलब्धतेशिवाय नव्याने भांडवली स्वरुपाचे कोणतेच नवीन काम न घेणे, प्रस्तावित व चालू प्रकल्पांचा आढावा घेऊन, निधी उपलब्धतेनुसार पुर्नविचार करणे, अनावश्यक खर्चावर निर्बंध घालणे, खर्चात काटकसर, वैधानिक बाबींचे वेळापत्रकानुसार प्रदाने, मालमत्ता करात वाढ होण्याच्या दृष्टीने पुर्नमुल्यांकनाचे काम युध्दपातळीवर सुरु असून, याद्वारे नवीन मालमत्तांचा शोध घेणे, मालमत्ता कराची वसुली पूर्ण क्षमतेने करणे तसेच अन्य वैधानिक मार्गाने महापालिकेचे उत्पन्न वाढविणेसंदर्भात, उपाययोजना सुरु करण्यात आलेल्या आहेत.

*******************************

टाब-१८२८-१२१

(५८)

विधानसभा लक्षवेधी सूचना

**सर्वश्री सुनिल प्रभू, दौलत दरोडा, अबु आजमी, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या वैतरणा धरण क्षेत्रातून बोटी व सक्षण पंपाच्या मदतीने पन्नासहून अधिक बांग्लादेशी कामगारांनी मोठ्या प्रमाणात बेकायदा रेती उपसा करीत असल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजी निदर्शनास येणे, रेती उपसा करणाऱ्या बोटी डिझेलवर चालविण्यात येत असल्याने धरणातील पाण्यावर तेलाचा तवंग पसरुन पिण्याचे पाणी दुषित होऊन लाखो मासे मृत्युमुखी पडत असणे, मुंबई महापालिकेने धरणांच्या सुरक्षिततेसाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांची नेमणूक करुनही सदरहू धरण क्षेत्रात बांग्लादेशी नागरीकांनी घुसखोरी केल्यामुळे धरणांच्या सुरक्षेला निर्माण झालेला गंभीर धोका, धरण क्षेत्रातून दररोज शेकडो ब्रास रेतीचे उत्खणन करुन विकासकास चढ्या भावाने विक्री करण्यात येणे, महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार घुसखोर बांग्लादेशी कामगारांच्या माध्यमातून शासनाचा कोट्यवधी रुपयाचा महसूल बुडवुन मोठ्या प्रमाणात आर्थिक घोटाळा करण्यात येत असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

-: <u>मा. मंत्री (नगर विकास) महोदयांचे निवेदन</u> :-

मुंबई शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या वैतरणा धरण क्षेत्रातून बोटी व सक्शन पंपाच्या मदतीने पन्नासहून अधिक बांग्लादेशी कामगारांनी मोठ्या प्रमाणात डिझेलवर चालणाऱ्या बोटी वापरुन बेकायदा रेती उपसा करीत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे धरणातील पाणी दुषित होऊन लाखो मासे मृत्युमुखी पडले नसल्याचे तसेच मोडकसागर धरणाच्या सुरक्षेसाठी सुरक्षा अधिकारी व शासन नियुक्त पोलीस गस्त पथकाकडून वेळोवेळी गस्त घालण्यात येत असल्याने धरण क्षेत्रातून रेती उत्खणन करुन चढ्या भावाने विक्री होत नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

तहसिलदार शहापूर यांच्या कार्यालयामार्फत दिनांक १३.०१.२०२० रोजी मौजे टेंभा व तानसा, ता. शहरापूर येथे दोन सक्शन पंप नष्ट करण्यात आले असून रेतीसाठा करण्यासाठी तयार केलेल्या कुंड्या निष्कासित करण्यात आल्या आहेत. तसेच अनधिकृत रेती वाहतुकीच्या दोन प्रकरणात रु. ३,३६,६५०/- इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली असल्याचे महसूल व वन विभागाने कळविले आहे.

रोहा/एच-1588 (750-3-2020)
*******

CR 257_2020_105_C_01

(९२)

# लक्षवेधी सुचना

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**मा.श्री.धर्मराव बाबा आत्राम, वि.स.स, यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना**

**"शासनाने माहे मे, २०१९ मध्ये शासनाची दूध भूकटी लिलावाव्दारे विक्रीचे आदेश दिल्यानंतर वैष्णोदेवी प्रा.कंपनी यांच्याकडे दूध भूकटी घेण्यासाठी माहे जून, २०१९ मध्ये लिलावधारक गेल्यानंतर तेथे दूध भूकटी उपलब्ध नसल्याचे व ती चोरी गेल्याचे निदर्शनास येणे, दरम्यानच्या कालावधीमध्ये प्रादेशिक दुग्ध व्यवसाय अधिकारी यांच्या तपासणीमध्ये साठयात तफावत नसल्याचे आढळून येणे तथापी रुपांतरणासाठी नियुक्त कर्मचारी यांनी नोंदी न ठेवणे, योग्य नियंत्रण न ठेवणे असे आरोप लावून निलंबनाची कारवाई केल्याचे विधान मंडळास चुकीची माहिती सादर केली जाणे, वास्तविक प्रादेशिक दुग्धव्यवसाय अधिकारी यांनी प्रत्यक्ष साठयाच्या नोंदी तपासणे, साठा कोठे ठेवला आहे व रुपांतरीत होत असलेली पावडर मानांकनाप्रमाणे तयार होत आहे किंवा नाही हे पाहून तशा नोंदी कनिष्ठ अधिकारी यांनी ठेवलेल्या दप्तरामध्ये करणे आवश्यक असणे, प्रत्यक्ष पावडर भेसळयुक्त केली जात असल्याचे लिलावधारक यांनी तपासणी अहवालासह तक्रार केली जाणे तथापी त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली न जाणे, एकंदरित दुग्ध व्यवसाय विभागाने कोणत्याही प्रकारे वैष्णोदेवी प्रकल्पात होत असलेल्या दूध भूकटीवर नियंत्रण ठेवलेले नसल्याचे व जाणीवपूर्वक दूर्लक्ष करुन, अकोला येथील गोडावून धारकांने बटर विक्री केली तरी त्यास काही झाले नाही त्याच धर्तीवर पावडर व बटर विक्री करण्यास कंपनीधारकास सहाय्य करुन संगनमताने मोठा मलिदा लाटलेला असणे, चोरी होवूनही तो कोणत्याही वाहनाने नेला, कोणास विकला, कोठे विकला व त्याचे पैसे कशाप्रकारे कुणी घेतले याबाबतचा तपास न होणे यामुळे शासनाच्या रु.४०.०० कोटी इतक्या पावड व बटरची झालेली चोरीची नुकसानभरपाई होणे दुरापास्त झालेले असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही आणि उपाययोजना."**

---

## मा.मंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे निवेदन

**शासकीय दूध योजनामध्ये सप्टेंबर २०१७ च्या सुमारास दूधाच्या संकलनात मोठया प्रमाणात वाढ झाल्याने गाय दुधाचे देशी कुकींग बटर व दूध भुकटी रुपांतरण करण्याची गरज निर्माण झाली होती. त्याबाबत शासनाकडे कोणतीही व्यवस्था नसल्याने राज्यातील सहकारी संघाकडून ई-निविदेव्दारे दरपत्रके मागवून श्री.वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रिया संघ, वारणा नगर यांना न्युनत्तम दराने रुपांतरण करण्यासाठी शासनाने मान्यता प्रदान केली. त्यानंतर एप्रिल २०१८ मध्ये शासकीय दूध संकलनात प्रति दिन १.५१ लक्ष वाढ झाल्याने वरील मंजूर दराने राजारामबापू पाटील दूध संघ,इस्लामपूर व भंडारा जिल्हा दूध उत्पादक संघ, यांना अतिरिक्त दूधाच्या रुपांतरणाचे काम देण्यात आले. तथापि उक्त संघांकडे दुधाची आवक वाढल्याने व अन्य कारणाने वारणा व राजारामबापू संघ यांनी प्रतिदिन ५० हजार लिटर पेक्षा अधिकच्या दूधाचे रुपांतरण करुन देण्यास असमर्थतता व्यक्त केल्याने अतिरिक्त दूधाची वाहतूक व पुर्नप्रक्रिया खर्चात बचत करण्यासाठी औरंगाबाद विभागातील नजिकच्या मे. वैष्णोदेवी फुड प्रॉ. प्रा. लि., बाभळगांव, पो. इटकळ, जि. उस्मानाबाद येथील दूध भुकटी प्रकल्पात वरील मंजुर दराने रुपांतरणाच्या प्रस्तावास दि. १८.९.२०१८ च्या पत्रान्वये शासनामार्फत मान्यता देण्यात आली. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद या**

रोटा H/1597 (750-03-2020)-1

कार्यालयामार्फत भरारी पथकाने दिनांक २१.८.२०१९ रोजी मे.वैष्णोदेवी प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देऊन साठयाची तपासणी केली असता, त्यांच्याकडे दुध भुकटी व देशी कुकींग बटरचा जेवढा साठा असणे आवश्यक होते त्याऐवजी ६१०.७९१ मे.टन दुध भुकटी व ४५२.६१६ मे.टन देशी कुकींग बटर कमी आढळून आले. उक्त प्रकल्पाच्या वरिष्ठ महाव्यवस्थापकानी शासकीय दुध योजने अंतर्गत तयार झालेल्या दुध भुकटी व देशी कुकींग बटरची विक्री शासनाच्या परवानगीशिवाय परस्पर केल्याचे मान्य केले.

उक्त कंपनीने दुध भुकटी व देशी कुकींग बटरचा साठा अन्यत्र कोठे लपविलेला आहे किंवा कसे याची पडताळणी उपदुग्धशाळा व्यवस्थापक यांच्याकडून करण्यात आली.

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद यांनी उक्त प्रकरणी पोलिस स्टेशन नळदुर्ग जिल्हा उस्मानाबाद येथे दिनांक २१.९.२०१९ च्या पत्रान्वये शासनाची रु.२७.१९ कोटी एवढया रक्कमेची फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल करण्याची तक्रार नोंदविली. यास अनुसरुन सहाय्यक पोलीस निरीक्षक नळदुर्ग यांनी गुन्हा क्र.२२८/२०१९ दिनांक ४.१०.२०१९ रोजी १)श्री.समिर गोविंदलाल काकाणी, अध्यक्ष २) श्री.विजय विश्वनाथ मुळे, वरिष्ठ महाव्यवस्थापक आणि श्री.श्रीकांत जोशी व इतर यांच्या विरुध्द भारतीय दंडसंहिता १८६० कलम ४२०,४०६,४०७ व ३४ खाली फौजदारी गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखा उस्मानाबाद यांच्याकडून करण्यात येत आहे.

तदनंतर पुन्हा दिनांक २५.९.२०१९ रोजी भरारी पथकाने इकोफ्रेश शीतगृह सोलापूर येथे वैष्णोदेवी प्रकल्पामार्फत साठविलेल्या देशी कुकींग बटरची पडताळणी केली असता तेथे जेव्हढा साठा असणे आवश्यक होते त्यापेक्षा २४१.३६ मे.टन इतका साठा कमी आढळून आला. यास अनुसरुन वाढीव रक्कम रु.७.३८ कोटी इतक्या रकमेचा प्रथम खबरी अहवालाची उक्त प्रकरणी गुन्हा क्र.२२८/२०१९ मध्ये नोंद घेण्याविषयी कळविले. याप्रमाणे दिनांक ४.११.२०१९ रोजी पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा यांनी एकूण रु.३४.५८ कोटी एवढया रकमेची शासनाची फसवणूक झाल्याची नोंद केली.

मे २०१९ मध्ये निविदा प्रक्रियेद्वारे उच्चतम दराने मे.श्रीनिथी इंटरप्रायेस प्रा.लि.यांना १७३४.४०६ मे.टन इतकी दुध भुकटीची विक्री दिनांक २१.६.२०१९ च्या आदेशान्वये करण्यात आली. दिनांक ५.८.२०१९ पर्यंत सदर फर्मने एकूण १११८.५ मे.टन इतकी उचल केली होती. सदर फर्मद्वारे दूध भूकटीच्या गुणप्रतीबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर भुकटी BIS व FSSAI मानकाप्रमाणे अटी व शर्तीनुसार उत्पादित असल्याची बाब फर्मच्या निदर्शणास आणून दिल्यानंतर त्यांनी उर्वरित ४१५.९ मे.टन दुध भुकटीची उचल दिनांक ४.९.२०१९ पर्यंत केली.

मे.वैष्णोदेवी फुड प्रा.लि. यांनी त्यांच्याकडील ६१०.७९१ मे.टन दूध भुकटीची परस्पर बेकायदेशीर विक्री केल्याने श्रीनिथी इन्टरप्रायजेस लि.तामिळनाडू,यांना विक्री करण्यात आलेल्या १७३४.०० मे.टन दूध भूकटीपैकी १५३४.४० मे.टन दूध भूकटी उपलब्ध करून देणे शक्य झाले, व उर्वरित १९९.६० मे.टन दूध भूकटी उपलब्ध करून देणे शक्य झाले नाही.

आयुक्त दुग्धविकास कार्यालयामार्फत उक्त रुपांतरणाचे कामकाजा करिता उत्पादित दूध भुकटी व बटर याचे गुणप्रत तपासणी ,साठयाची तपासणी करणे व रुपांतरणाकरिता आवश्यक नोंदवही तपासणे याबाबत वेळोवेळी प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, औरंगाबाद यांना निर्देश देण्यात आले होते. या रुपांतरण कामकाजाकरिता नियंत्रक अधिकारी म्हणून श्री.आर.एस.जाधव, उप दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, उदगीर, यांची तसेच श्री.पी.एस.भोसले, सहा. दुग्धशाळा रसायनतज्ञ व श्री.जी.पी.पवार, दुध संकलन पर्यवेक्षक यांच्या नियुक्त्या केल्या होत्या. संबंधित कर्मचारी यांनी दैनंदिन दूध उत्पादन नोंद न करणे, साठयाची वेळोवेळी तपासणी न करणे व संबंधित कामकाजावर योग्य प्रकारे नियंत्रण न ठेवणे याप्रकारे कामात निष्काळजीपणा केल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास आले. त्यामुळे

H11597-1a

श्री.आर.एस.जाधव, उप दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, उदगीर यांना शासनाने दि.१७/१०/२०१९ च्या आदेशान्वये व श्री.पी.एस.भोसले, सहा. दुग्धशाळा रसायनतज्ञ व श्री.जी.पी.पवार, दुध संकलन पर्यवेक्षक यांना आयुक्त,दुग्धव्यवसाय यांनी दि.२१/०९/२०१९ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

उक्त गुन्हयाच्या संदर्भात जिल्हा सत्र न्यायालय,उस्मानाबाद यांनी आरोपीचा जामिन अर्ज ऑक्टोबर २०१९ मध्ये फेटाळला आहे. यानंतर उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद येथेही आरोपींनी आव्हान जामिन अर्जाव्दारे विनंती केली होती. सदर जामिन अर्ज दि.१९/१२/२०१९ च्या निर्णयाव्दारे रद्द केला आहे. तद्नंतर सदर आरोपींनी मा.सर्वोच्च न्यायालय येथे स्पेशल लिव्ह पिटिशन दाखल केली होती. सदर प्रकरणाच्या सुनावणी दिवशी विभागाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात प्रतिनिधी उपस्थिती करुन शासनाची बाजू भक्कमरितीने मांडली. मा.सर्वोच्च न्यायालयाने, सदर अटकपुर्व जामिनाचे अर्ज फेटाळून आरोपीच्या विनंतीनुसार दोन आठवडयात शरण जाण्यासाठी आदेशित केले.

उक्त आदेशानुसार तीनही आरोपींनी तुळजापूर येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात शरण जावून नियमित बेल मिळणेसाठी अर्ज क्रमांक १३४/२०२० दाखल केला. या अर्जाच्या अनुषंगाने विभागाकडून व आर्थिक गुन्हा शाखा,उस्मानाबाद यांच्याकडून सरकारी वकील, तुळजापूर यांना सर्व आवश्यक ती माहिती व वस्तुस्थिती सादर करुन आरोपीचा नियमित बेल अर्ज फेटाळण्याची विनंती केल्यानुसार न्यायालयाने दि.६/०२/२०२० रोजी अर्जदाराचा बेल अर्ज सविस्तर निर्णय देऊन फेटाळला आहे. सद्यस्थितीत सदर आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

सदर गुन्हयांचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, उस्मानाबाद करीत असून त्यांच्यामार्फत उक्त फर्मची बँक खाती गोठविण्याची कार्यवाही करण्यात आली असून गुन्ह्यातील देशी कुकिंग बटर व दूध भुकटी विक्री केलेल्या ठिकाणांची माहिती तसेच ज्या वाहनातून पाठविण्यात आले त्यांचा तपशिल प्राप्त करुन घेतला आहे.

शासकीय दूध योजना, अकोला येथे उत्पादित होणारे पांढरे लोणी साठवणूकीकरिता प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,अमरावती यांचे स्तरावर सन २००५-२००६ या वर्षामध्ये निविदा प्रक्रियान्वये मे.अकोला कोल्ड स्टोअरेज ॲन्ड आईस फॅक्टरी यांना काम देण्यात आले होते. सदर फर्मकडून चुकीची परिगणना करुन देयके सादर करण्यात आली. सदर देयकांच्या रकमेच्या अनुषंगाने उक्त फर्मने शासन मान्यतेशिवाय रु.८,६३,७९२/- रक्कमेचे कोल्ड स्टोअरेजमध्ये असलेले पांढरे लोणी विक्री केले.

शासकीय दूध योजना, अकोला येथील पांढरे लोणी याची रक्कम वसूली करणेकरिता महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, अकोला यांनी सिव्हील लाईन पोलीस स्टेशन येथे सन २००८ मध्ये गुन्हा दाखल केला असून, याअनुषंगाने सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. वैष्णोदेवी फूड प्रॉडक्ट व अकोला या दोन्ही घटना परस्पर वेगळया असून त्यांचा एकमेकांशी संबंध नाही.

मे.वैष्णोदेवी प्रा.लि.यांनी शासनाचे केलेले नुकसान वसूल करण्याकरिता प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, आयुक्त दुग्ध विकास कार्यालय यांचेकडून वारंवार आर्थिक गुन्हा शाखा व संबंधित सरकारी अभियोक्ता यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. यानुसार शासनाच्या झालेल्या नुकसानीची सुधारित परिगणना करुन अंदाजे रु.३८.०७ कोटी इतकी रक्कम अधिक त्यावरील व्याज आरोपी यांच्या मालमत्तेतून शासनाच्या झालेल्या नुकसानीची वसुली करण्यासाठी महसूल वसूली प्रमाणपत्र (Revenue Recovery certificate) अन्वये कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

लक्षवेधी सुचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. श्री. चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"नानाजी देशमुख कृषि संजिवनी प्रकल्पांतर्गत मुक्ताईनगर-बोदवड तालुक्यातील (जि. जळगांव) ६० व १४ गावे असून या गावात ही योजना सुरु करणे, मात्र अर्ज केलेल्या शेतकऱ्यांना पूर्व संमती देऊन विद्युत पंप संच, पीव्हीसी पाई, शेळ्या, ठिबक सिंचन संच खरेदी करण्याचे मोबाईल संदेशाद्वारे दिलेले आदेश, यातून बऱ्याच शेतकऱ्यांनी साहित्य खरेदी करणे, मात्र शेळी पालन या घटकांकरिता मुंबई येथून शेळ्या खरेदीबाबत जिल्ह्याबाहेरून किंवा शेळी मेंढी विकास महामंडळ चाळीसगांव येथून खरेदीबाबत संभ्रमावस्था निर्माण करणे आणि खरेदी करुनये असे मोबाईलवरन सूचना देणे, मात्र तीन ते चार महिने निर्णय् न झाल्याने शेवटी कर्मचाऱ्यांनी तोंडी विचारणा करून आसलगांव, जि. बुलढाणा येथे दि. १८.२.२०२० रोजी च्या सुमारास ११८ शेतकऱ्यांच्या १२९८ शेळ्या खरेदी करणे, मात्र त्या दिवसांपासून मोबाईल ॲपवरील तांत्रिक अडचणी, शेळ्या खरेदी विमा पावत्या इत्यादी अडचणीमुळे बिले व विमा पावत्या अपलोड करु न शकणे, तसेच पीव्हीसी पाईत, विद्युत मोटार आणि ठिबक सिंचन संच या घटकांचे दि. १.२.२०२० पासून मोबाईल ॲपमध्ये केलेल्या बदलामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या मोबाईल ॲपवरील असुविधेमुळे शेतकरी वा कर्मचारी स्वत: बिल अपलोड करून शकले नाही आणि दि.२७.२.२०२० पासून ४५ दिवसापेक्षा जादा कालावधीच्या पूर्वसंमत्या रद्द केल्याने जवळपास ४०-५० शेतकरी अनुदानापासून वंचित राहणे, परिणामी त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याकरिता ज्या शेतकऱ्यांचे शेळ्या, पीव्हीसी पाईप, विद्युत पंप आणि ठिबक सिंचन संच दि. २७.२.२०२० पूर्वी खरेदी झालेले आहेत अशा शेतकऱ्यांना पुन्हा पूर्व संमती देऊन अनुदान वर्ग करण्याबाबत आदेश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची नितांत गरज, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

## श्री. दादा भुसे, मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत जळगांव जिल्हयातील मुक्ताईनगर तालुक्यातील ६० गावांचा आणि बोदवड तालुक्यातील १४ गावांचा समावेश आहे. या प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाच्या घटकांपैकी केवळ पाईप, पंपसंच, यांत्रिकीकरण व नवीन विहीर या ४ घटकांसाठी आर्थिक लक्षांकानुसार कार्यवाही करावयाची आहे तसेच, शेळीपालन या घटकाच्या अंमलबजावणीचा पूर्वानुभव विचारात घेऊन सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यात (जि.जळगाव) विविध घटकासाठी पूर्वसंमत्ती दिलेल्या अर्जांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :-

| घटक | पूर्वसंमत्ती दिलेल्या अर्जांची संख्या | | | लाभ दिलेल्या अर्जांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुक्ताईनगर | बोदवड | एकूण | मुक्ताईनगर | बोदवड | एकूण |
| शेळीपालन | १५२३ | १५० | १६७३ | १७३ | २७ | २०० |
| विद्युत पंप संच | ५५६ | ९३ | ६४९ | ६८ | ३० | ९८ |
| पाईप | ८३६ | ११९ | ९५५ | १७४ | ४० | २१४ |
| ठिबक सिंचन संच | ५५२ | ३९ | ५९१ | ५३ | ४ | ५७ |
| इतर घटक | ४०५ | ५५ | ४६० | ५९ | ० | ५९ |
| एकूण | ३८७२ | ४५६ | ४३२८ | ५२७ | १०१ | ६२८ |

रोटा-एच ९६५३ (७५०-३-२०२०)-९   [कृ.मा. प

प्रकल्पांतर्गत अर्जदार शेतक-यास ज्या घटकासाठी पूर्वसंमती दिलेली आहे व शेतक-याने त्याची विहित मुदतीत प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेली आहे त्यास देय आर्थिक लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

प्रकल्पांतर्गत वैयक्तिक घटकांचा लाभ घेणेसाठी प्रकल्पाकडून डीबीटी पोर्टल विकसित केलेले आहे. सदर पोर्टलमध्ये आवश्यक घटकांसाठी अर्ज करणे, घटकाची अंमलबजावणी केल्यानंतर पावत्या व इतर आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे याबाबी शेतकरी / लाभार्थी स्वतः अथवा प्रकल्पातील अधिका-यांच्या मदतीने करू शकतात. सदर पोर्टलमध्ये तांत्रिक अडचण येणार नाही याची वेळोवेळी दक्षता घेणेत येते. सद्यस्थितीत प्रकल्पांतर्गत 'शेळीपालन' या घटकासाठी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे शेळी खरेदी कोठून करावी याबाबत उपविभागीय कृषि अधिकारी यांचेस्तरावरून निर्णय घ्यावयाचा आहे. शेळीपालन बाबीचा लाभ घेणारे लाभार्थी/ शेतकरी यांना आर्थिक लाभ मिळणेकामी मार्गदर्शक सुचनांनुसार शेळी खरेदी करून खरेदीचे बिल व विमा पावती अपलोड करणे आवश्यक आहे.

प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीसाठी कृषि सहाय्यक व समुह सहाय्यक यांच्या बरोबरच कृषि पर्यवेक्षक, मंडळ कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांचाही समावेश डीबीटी पोर्टलमध्ये दि. १.२.२०२० पासून करण्यात आलेला आहे. सदर बदल प्रकल्प अधिका-यांना कळविणेत आलेले आहेत.

पूर्वसंमती पत्रामध्ये घटक अंमलबजावणीसाठीचा कालावधी नमूद केलेला असतो. पूर्वसंमती देऊन व पुरेसा कालावधी होऊनही घटकाची अंमलबजावणी शेतकरी करत नसल्याने उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध निधीचा लाभ देणे शक्य होत नाही. त्यामुळे पूर्वसंमती पत्रामध्ये नमूद कालावधीच्या दुपटीपेक्षा अधिक कालावधी उलटूनही मंजूर घटकाची अंमलबजावणी न केलेल्या शेतक-यांना १० दिवसांत त्यांना मंजूर केलेल्या घटकाची अंमलबजावणी करून डीबीटी पोर्टलवर अनुदानाची मागणी नोंदविण्याबाबत त्यांचे मोबाईलवर दि. ५.२.२०२० रोजी लघुसंदेश पाठविण्यात आले होते. सदर संदेशानंतर २० दिवसांनी घटकांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करून डीबीटी पोर्टलवर अनुदानाची मागणी न केलेल्या शेतक-यांना दि. २६.२.२०२० रोजी त्यांची पूर्वसंमती रद्द केल्याचा लघुसंदेश पाठविण्यात आले आहेत. याउपरही बोदवड व मुक्ताईनगर तालुक्यातील शेतकऱ्यांसह प्रकल्पांतर्गत ज्या लाभार्थ्यांनी मार्गदर्शक सुचनांनुसार घटकांची अंमलबजावणी केलेली आहे तथापि त्यांना आवश्यक कागदपत्रे मोबाईल ॲप वर अपलोड करता आली नसतील त्यांना अनुदान देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही करता येईल.

**************

पच - १६५३ - १अ

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२० चे पहिले (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

मा. सर्वश्री. अभिमन्यु पवार, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, ॲड आशिष शेलार, सर्वश्री.राणाजगजीतसिंह पाटील, राहूल कुल, चंद्रकांत पाटील, ॲड आकाश फुंडकर, श्री.बळवंत वानखेडे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

शेतक-यांची आर्थिक उन्नती व्हावी, यासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राबविण्यात येत असणे. प्रकल्पांतर्गत निवडलेल्या गावामध्ये शेळीपालन, वैयक्तिक शेततळे, सामुदायिक शेततळे, अस्तरीकरण, नविन विहीर, ठिबक सिंचन, तुषार सिंचन, पाईप, पंपसंच, डीझेल इंजिन, बिजोत्पादन, रेशीम उद्योग, शेडनेट, ट्रक्टर, ट्रक्टर चलित अवजारे अशा विविध वैयक्तिक लाभाच्या योजना घेता येणे, संबंधित गावातील अनेक शेतकरी ऑनलाईन अर्ज करुन गरजेच्या योजनेचा लाभ घेत असणे, यामाध्यमातुन शेतकरी आर्थिक दृष्टया सक्षम होण्याचा प्रयत्न करीत असणे. योजनेचा होणारा फायदा विचारात घेउन वर्षागणिक अर्जदार शेतक-याची संख्या वाढत असणे, असे असतानाच आता शासनाने प्रत्येकघटकासाठी लक्षांक निश्चित करुन दिले असणे, उद्दिष्टापेक्षा अनेक पटीने मागणी अर्जाची संख्या असणे, त्यामुळे शेतक-यांच्या मागणी प्रमाणे विविध घटकासाठी लाभ मिळत नसल्याच्या तक्रारी शेतकरी करीत असणे, त्यासाठी पूर्वी प्रमाणे प्रत्येक पात्र शेतक-यांना मागणी प्रमाणे अनुदानीत घटकांचा लाभ देण्याबाबत व लक्षांकाचे बंधन रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

### श्री. दादा भुसे, मा.मंत्री (कृषि) यांचे निवेदन

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील त्याची व्याप्ती वाढणार आहे व त्यामुळे शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत आहे. "महाराष्ट्रातील १५ जिल्ह्यातील ५१४२ गावांतील शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास सक्षम करणे आणि शेती व्यवसाय किफायतशीर करण्यास सहाय्य करणे" या उद्देशाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे रु. ४००० कोटी गुंतवणूकीचा नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या अंमलबजावणीस दि. १८ मे २०१८ पासून सुरुवात झाली असून प्रकल्प सन २०२४ पर्यंत राबविण्यात येणार आहे.

प्रकल्पांतर्गत वैयक्तिक घटकाच्या २,८६,००० शेतकऱ्यांना पूर्वसंमती देण्यात आली आहे व त्यापैकी घटकाची अंमलबजावणी केलेल्या ५०,९१४ शेतकऱ्यांना रु.१४५.१२ कोटी अनुदान अदा केले आहे.

प्रकल्पातील जिल्हयांमध्ये विविध वैयक्तिक लाभाच्या घटकांवर झालेल्या खर्चात मोठ्या प्रमाणात विषमता आढळून आली आहे. प्रकल्पांतर्गत सर्व गावांचा व जिल्ह्यांचा विकास करणे तसेच सर्व घटक राबविण्यास असलेला वाव विचारात घेऊन सर्व गावसमुहांमध्ये त्यांची अंमलबजावणी होण्यासाठी व घटकनिहाय होणाऱ्या खर्चाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्यासाठी प्रकल्पांतर्गत विविध घटकांचे आर्थिक लक्षांक कळविण्यात आले आहेत.

[कृ.मा.प.

शेटा/एच-1589(750-3-2020)-1

प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाच्या घटकांपैकी केवळ पाईप, पंपसंच, यांत्रिकीकरण व नवीन विहीर या ४ घटकांसाठीच आर्थिक लक्षांकानुसार त्यासाठी दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार कार्यवाही करावयाची आहे आणि शेळीपालन या घटकाच्या अंमलबजावणीत आलेला पूर्वानुभव विचारात घेऊन सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात येत आहेत. सदर घटकांशिवाय प्रकल्पांतर्गत अन्य घटकांसाठी दिलेले आर्थिक लक्षांक हे किमान असून, त्यासाठी कमाल मर्यादा ठेवण्यात आलेली नाही. सदर घटकांबाबत दिलेल्या आर्थिक लक्षांकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त असल्यास सर्व प्राप्त अर्ज मंजुरीबाबत आवश्यक कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

त्यामुळे प्रकल्पातील सर्व गावात विविध घटकनिहाय होणाऱ्या खर्चाचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होणार आहे व त्याचा लाभ निवडलेल्या गावातील लाभार्थींना होणार आहे त्याचप्रमाणे, प्रकल्पांतर्गत देण्यात येणारे हवामान अनुकूल तंत्रज्ञान व वैयक्तिक लाभाच्या बाबी सर्व गावांना समन्यायी पध्दतीने पोहचविण्यासाठी मदत होणार आहे.

**************

एप - 1589 - 1a

## सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.राजू पारवे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" (ता. कुही जि. नागपूर ) सिल्ली भोजापुर शिवारात खसरा क्र. ४२५ आराजी १४.१६ हेक्टर जागेची नोंद शासकीय रेकॉर्डवर झुडपी जंगल म्हणून असून सुध्दा वनकायदे शासनात शासकीय योजनेच्या गुंडाळन एकाच शेतक-यासाठी ७० लक्ष इतका निधी खर्चून शासकीय योजनेतून बंधारा बांधण्यात आल्याची बाब दिनांक १२/०२/२०२० रोजी उघडकीस येणे, १४ हेक्टर झुडपी जंगल असलेल्या संरक्षित जमिनीतून २ हेक्टर जागा एका खासगी सेवानिवृत्त सैनिकाला ताब्यात देणे, खसरा क्र. ४२५ याच पट्ट्यात त्या नंबर ची आराजी १४.१६ हेक्टर आर एवढी असून त्याच नंबरमध्ये त्या खासगी मालकाला स्वत:च्या उपयोगाकरीता शासकीय योजनेमधून शेतक-याला लाभ देण्यात येणे, वनजमिनीत कुठलाही नाला नसताना २ वर्षांपूर्वी जिल्हा परिषद लघुसिंचन उपविभागाकडून त्याच एका शेतक-याकरीता शासकीय यंत्रणा वापरुन वनजमिनीत पाणी आडवा, पाणी जिरवा योजनेअंतर्गत नाला बांधकाम करण्यात येणे, यामुळे इतर शेतक-यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

### निवेदन

मौ.भोजापूर, ता. कुही, जि. नागपूर येथील भूमापन क्र. ४२५ हा वनकक्ष क्र. ३९४ चा भाग असून बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट क्र. एफएलडी-१२५८/II-३३१४-E, दि.२७.०८.१९५९ अन्वये सदर जमीन भारतीय वन अधिनियम,१९२७ चे कलम -४ अन्वये अधिसूचित करण्यात आली आहे. सदर अधिनियमाच्या कलम ५ च्या तरतूदीनुसार कलम-४ खाली अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून सदर जमिनीवर कोणतेही नवीन अधिकार प्रस्थापित करण्यास मनाई आहे.

मौ. भोजापूर येथील गट क्र. ४२५ च्या पुर्नमोजणीप्रमाणे एकूण क्षेत्र १५.१५ हे. आर असून त्यापैकी २.०० हे. क्षेत्र तत्कालीन तहसिलदार यांच्या दि.२९.०७.१९८९ रोजीच्या आदेशाने व फेरफार क्र.१४२, दि.२८.०९.१९८९ अन्वये श्री.दौलत वारलू सोनसरे यांना वाटप झाल्याचे गा. न. नं. ७/१२ मधील नोंदीनुसार दिसून येते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अंतर्गत विविध योजनेंतर्गत पट्टा अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या जमिनी (भूमीहीन, शेतमजूर, स्वातंत्र्य सैनिक इ.) नुसार वाटप करण्यात आल्याचे रेकॉर्डवर नमूद आहे. सदर आदेश जारी करण्यापूर्वी वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत केंद्र शासनाची पूर्व मंजूरी मिळविली असल्याचे दिसून येत नाही.

भोजापूर कोल्हापूरी बंधारा जलयुक्त शिवार योजना २०१८-१९ अंतर्गत मंजूर असून भोजापूर येथील स्थानिक नाल्यावर जलसंधारण विभागाकडून बांधण्यात येत आहे. सदर बंधा-याचा एकूण पाणीसाठा ६२ स.घ.मी. असून यावर ३५ हे. सिंचन अपेक्षित आहे. सदर बंधा-यास जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जलयुक्त शिवार अभियान. नागपूर यांनी दि.१५.१२.२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. सदर बंधा-यामुळे किमान १६ शेतक-यांना एकूण ३५ हेक्टर क्षेत्र सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.

*****

## सन २०२० चे अर्थसंकल्पीय अधिवेशन

**श्री.धर्मरावबाबा आत्राम, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"राज्यातील रस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध रस्ते विकास योजनांतर्गत वन विभागातून जाणा-या रस्त्यांची कामे करतांना वन विभागाची पूर्व परवानगी घ्यावी लागणे, गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, अतिसंवेदनशिल नक्षलग्रस्त जिल्हा असून जिल्ह्याचा ७८ % भूभाग जंगलाने व्यापलेला असून जिल्ह्यामध्ये १५१३ गावे असून त्यापैकी बरीच गावे आदिवासी बहूल असून जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या ३८.७१ % असणे, विकासाच्या दृष्टीने हि गावे बारमाही रस्त्याने जोडणे आवश्यक असणे, तथापि गडचिरोली या जिल्ह्यात शासनातर्फे सन १९८९ मध्ये विशेष कृती कार्यक्रम अंतर्गत प्रत्येक खेड्यांना बारमाही रस्त्याने जोडण्याकरीता रस्ते व पूल तयार करण्याकरीता कार्यक्रम राबविण्यात आला परंतु नक्षल कारवांयामुळे सदर कामे मोठा कालावधी लोटून रस्ते व पुलांची कामे पूर्ण न होणे, त्यानंतर शासनाने BRO (सिमा रस्ते संगठन) शी सामंजस्य करार करून रस्ते व पुलाची कामे करावयाचे नियोजन करणे व त्यानुसार BRO ने २०१० पर्यंत रस्ते व पुलांची कामे करण्यात येवून व त्यापुढील कामे करण्यास असमर्थता दर्शविण्यात येणे, त्यामुळे जिल्ह्यातील सर्व रस्ते व पूलांची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फतच करण्यात येत असणे, परंतु वन विभागाच्या जाचक अटीमुळे रस्ते व पूल बांधकामाकरीता व इतरही मूलभूत विकासाच्या सोयी सुविधा पुरविण्याकरीता तसेच वन विभागातून जाणा-या रस्त्याची कामे करतांना वन विभागाकडून पूर्व परवानगी न घेतल्यामुळे अनेक अधिकारी / कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल झाल्याचे अनेक प्रकरण उघडकीस येणे, त्यामुळे सदर कामे पूर्ण होण्यास विलंब होत जाणे, गडचिरोली जिल्ह्याच्या भौगोलीक क्षेत्राचा विचार करता वन विभागाकडून ज्या जाचक अटी लावण्यात आल्या आहेत त्या शिथील करण्याची अत्यंत तातडीची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमीका."

---

## निवेदन

सन २०११ च्या जनगणनेनुसार गडचिरोली जिल्ह्याची अनुसुचित जमातीची लोकसंख्या ३८.७१ % आहे. गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण १५१५ गावे आहेत. त्यांपैकी १२२५ गावे बारमाही रस्त्यांनी तर २२३ गावे आठमाही रस्त्यांनी जोडली गेली आहेत. जिल्ह्यात आर. आर. पी. टप्पा-२ अंतर्गत १६५ कि. मी. लांबीची एकूण ४३ कामे मंजूर आहेत. तर हायब्रीड ॲन्युईटी अंतर्गत १४६.९४ कि.मी. लांबीची ३ कामे मंजूर आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाने सीमा रस्ते संघटना (BRO) यांचेशी सन १९९४ व १९९६ मध्ये सामंजस्य करार करून गडचिरोली जिल्ह्यातील डावी कडवी विचारसरणी क्षेत्रात सन २००१ पर्यंत ६१२.७१ कि.मी. लांबीचे रस्ते व पुलांचे बांधकाम देण्यात आले होते. सदर कामे अपूर्ण राहिल्याने सन २००८ मध्ये सामंजस्य करारास सन २०१२ पर्यंत मुदतवाढ दिली होती. तथापि, दि. ३१.०३.२०१० नंतर सामंजस्य करार सुरू ठेवण्यास सीमा रस्ते संघटनेने असमर्थता दर्शविली आहे.

गडचिरोली जिल्हा अतिसंवेदनशील, नक्षलग्रस्त व दुर्गम असल्याने पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनस्तरावरून अनेक प्रयत्न करण्यात येत आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील ७७.०१ % क्षेत्र हे वनक्षेत्र असल्याने तेथील रस्त्यांच्या काही कामांना वन विभागाच्या मंजुरीची आवश्यकता असते. वनक्षेत्रातील रस्त्यांची कामे करण्यासाठी प्रकल्प यंत्रणेने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक असते. सदर प्रस्तावास केंद्र / राज्य शासनाची पूर्व परवानगी आवश्यक असते.

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अस्तित्वात येण्यापूर्वी म्हणजेच दि.२५.१०.१९८० पूर्वी वनक्षेत्रात अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे अस्तित्वातील रूंदीमध्ये डांबरीकरण व अद्ययावतीकरण करण्यास परवानगी देण्याचे अधिकार केंद्र शासनाने राज्य शासनास प्रदान केले आहेत. त्याअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील रस्त्यांच्या विविध ४४ कामांसाठी परवानगी देण्यात आली आहे.

रस्ते, कालवे, पारेषण वाहिन्या इ. प्रकारचे एकरेषीय प्रकल्प जलदगतीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सक्षम प्राधिकरणाच्या तत्वत: मंजूरी नंतर आवश्यक अटींची पूर्तता केल्यास वन विभागामार्फत झाडे तोडण्याची व काम सुरू करण्याची परवानगी देण्यात येते.

केंद्र शासनाने नक्षल प्रभावित भागात केंद्र किंवा राज्य शासनामार्फत विकसित करण्यात येणा-या शाळा, शैक्षणिक संस्था, दवाखाने, वीज व दूरसंचार तारा, लघु सिंचन कॅनॉल, अपारंपारिक उर्जा स्त्रोत, वीज उपकेंद्रे, सार्वजनिक रस्ते, पोलीस मदत केंद्र अशा प्रकारच्या विविध १४ सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ४० हे .च्या मर्यादेत वनजमीन वळतीकरणाचे अधिकार राज्य शासनास प्रदान केले आहेत .तसेच केंद्र किंवा राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या उक्त प्रकल्पांसाठी ५ हे. च्या मर्यादेत वनक्षेत्र आवश्यक असल्यास व प्रति हेक्टरी ५० पेक्षा कमी वृक्षतोड होणार असल्यास पर्यायी वनीकरणातून देखील सूट दिली आहे.

याव्यतिरिक्त अनुसूचित जमाती व इतर परंपरागत रहिवाशी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (२) अंतर्गत गावाला जोडणा-यां नवीन जोड रस्त्याकरीता जर ७५ पेक्षा जास्त वृक्षतोड होणार नसेल तर १ हे. च्या मर्यादेत परवानगी देण्याचे अधिकार संबंधित उपवनसंरक्षक यांना आहेत. त्यांतर्गत गडचिरोली जिल्ह्यातील मागील तीन वर्षात रस्त्यांच्या विविध २८ कामांसाठी वनजमीन वळती करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

अशा प्रकारे गडचिरोली जिल्ह्यातील प्रकल्पांसाठी वन मंजूरी मिळण्याची प्रक्रिया सोपी करण्यात आली आहे. तथापि, काही वेळी वन विभागाकडे वनमंजूरीसाठी परिपूर्ण दस्ताऐवजासह प्रस्ताव सादर न करता कंत्राटदाराच्या नावे कार्यारंभ आदेश काढल्यानंतर कंत्राटदाराकडून वनजमिनीमध्ये वनभंग केल्याचे निदर्शनास येते. अशा प्रकरणांमध्ये वन विभागाकडून संबंधित कंत्राटदाराविरूध्द वनगुन्हे नोंदविले जातात.

*****

## सन २०२० चे द्वितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

**पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग**

सर्वश्री कुणाल पाटील, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री.मोहनराव हंबर्डे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे.

**"धुळे तालुक्यातील फागणे व २० गाव पाणी पुरवठा योजना देखभाल, दुरूस्ती व थकीत वीजबिलामुळे बंद पडली आहे. या योजनेतंर्गत धमाणे, नगाव, बिलाडी, निमखेडी, कुंडाणे, वणी, आर्णी, बाळापूर, फागणे, पिंप्री, वडजाई, अजंग, काळखेडा, आमदड, मुकटी, भिरडाई, चिंचखेडा, सावळी या गावांना पाणी पुरवठा केला जात होता. सदर योजना बंद पडल्यामुळे समाविष्ट गावांना भिषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. सदर योजना पुनर्जिवित करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असून तो मंजूर होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच धुळे तालुक्यातील सोनगीर व १४ गाव पाणी पुरवठा योजनेसाठी तापी नदी उद्भव घेऊन पुनर्जिवित केल्यास तालुक्यातील सर्वात जास्त लोकसंख्येचे गाव असलेल्या सोनगीर गावाचा पाण्याचा प्रश्न संपेल. तसेच धुळे जिल्हा परिषदेत भूवैज्ञानिकची जागा रिक्त असल्यामुळे पाणी पुरवठा विभागाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अनेक पाणी पुरवठा योजनांची व सर्वेक्षणाची कामे ठप्प आहेत. गेल्या वर्षीच्या टंचाईचे अनुदान अद्याप धुळे पाणी पुरवठा विभागाला प्राप्त झालेले नाही, तरी सदरील अनुदान त्वरीत मिळण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व प्रतिक्रिया."**

---

### मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

धुळे तालुक्यातील फागणे व २० गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रू.२३९५.६२ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०१.०६.१९९८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदर योजना सन २०३१ च्या लोकसंख्येसाठी ५५ लिटर दरडोई दरदिवशी प्रमाणे तयार करण्यात आली होती. त्यानुसार योजनेच्या कामास दिनांक ०९.०२.१९९९ रोजी सुरूवात करून दिनांक २०.१०.२००५ रोजी पूर्ण करण्यात आली. तदनंतर योजना पुढील देखभाल दुरूस्तीसाठी जिल्हा परिषद, धुळे यांचेकडे दिनांक ०५.०२.२००६ रोजी हस्तांतरीत करण्यात आली. सदर योजना शिखर समितीमार्फत काही वर्षे चालविण्यात आली मात्र माहे ऑगस्ट, २०१३ पासून थकीत विद्युत देयकामुळे योजना बंद आहे.

२. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पुनर्जिवित करावयाच्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांमध्ये सदर योजनेचा समावेश करण्यात आलेला होता. त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला होता. तथापि तत्कालीन प्रधान सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीच्या दिनांक २३.११.२०१६ रोजीच्या बैठकीत सदर प्रादेशिक योजनेत समाविष्ट गावांना अलीकडच्या कालावधीत राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत स्वतंत्र योजना राबविण्यात आल्या

असल्याने, तसेच सदर योजना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण नसल्याने पुनर्जिवित करण्यात येवू नये असा निर्णय घेण्यात आला.

३. तदनंतर तत्कालीन अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीच्या दिनांक ०८.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत सदर योजना आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने तपासून फेरसादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार अधिक्षक अभियंता यांनी दिनांक ०२.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये रू.५१०.८२ लक्ष इतक्या किंमतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केला होता. तथापि योजनेत समाविष्ट बहुतांश गावांना अलीकडच्या कालावधीत स्वतंत्र योजना राबविण्यात आल्या असल्याने तसेच ज्या कालावधीत प्रादेशिक पाणी पुरवठा योजना चालविण्यात आली त्या कालावधीतील पाणीपट्टी वसूली ही ५ टक्केपेक्षाही कमी असल्याने योजना पुनर्जिवित करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसल्याचे मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नाशिक यांना दिनांक २१.०१.२०१९ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आले.

४. तदनंतर श्री.कुणाल पाटील, विधानसभा सदस्य यांच्या दिनांक २१.०६.२०१९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नाशिक यांचेकडून योजनेत समाविष्ट सर्व गावांच्या माहितीसह प्रस्ताव पुन्हा सादर करण्याच्या सूचना विभागाच्या दिनांक २८.०६.२०१९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आल्या. त्यानुसार अधिक्षक अभियंता, म.जी.प्रा., नाशिक यांनी दिनांक १८.१०.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेच्या पुनर्जिवनाचा रू.६५१.०५ लक्ष इतक्या किमतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे. त्यानुसार २१ गावांपैकी १५ गावांनी योजनेतून पाणी घेण्याबाबत ठराव दिला असून ६ गावांनी ठराव दिलेला नाही. त्यानुषंगाने विभागाच्या दिनांक २८.११.२०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत योजना पुनर्जिवित करणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य होईल किंवा कसे याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

५. फागणे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट २१ गावांपैकी १८ गावांना सन २०११-१२ ते सन २०१४-१५ या कालावधीत स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. त्यातून पाणीपुरवठा करण्यात येत आहे. दोन गावांना ग्रामपंचायतीच्या विहिरीवरून पाणी पुरवठा करण्यात येत आहे. तर उर्वरीत एका गावाचा जळगाव जिल्ह्यात समावेश झाला आहे.

६. धुळे तालुक्यातील सोनगीर व १८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या रू.१६८३.०० लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक २१.०४.१९९८ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. सदर योजना सन २०३० च्या लोकसंख्येसाठी ५५ लिटर दरडोई दरदिवशी प्रमाणे तयार करण्यात आली होती. त्यानुसार योजनेच्या कामास दिनांक २३.०२.१९९९ रोजी सुरूवात करून दिनांक ३०.१०.२००५ रोजी योजनेची काम पूर्ण करण्यात आली. तदनंतर योजना पुढील देखभाल दुरूस्तीसाठी जिल्हा परिषद, धुळे यांचेकडे दिनांक १९.०२.२००६ रोजी हस्तांतरीत करण्यात आली. सदर योजना शिखर समितीमार्फत काही वर्षे चालविण्यात आली मात्र माहे ऑगस्ट, २०१३ पासून थकीत विद्युत देयकामुळे योजना बंद आहे.

७. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत धुळे तालुक्यातील सोनगीर व १८ गावे प्रादेशिक पाणी पुरवठा योजना पुनर्जिवित करणे दिनांक ०७.०५.२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार

प्रस्तावित होते. मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजना पुर्नजिवित करण्याकरिता संबंधित गावानी "दरमहा ७० टक्क्यांप्रमाणे पाणीपट्टी वसूली करण्याबाबत व वसूली न झाल्यास पाणी पुरवठा बंद करून गावास योजनेतून वगळण्यात येईल" अशा प्रकारचा ग्रामसभा ठराव देणे आवश्यक होते. तथापि सोनगीर वगळता कोणत्याही गावाने ठराव दिला नाही. तसेच संबंधित गावांच्या ग्रामसभांचे ठराव पारित करून देण्यासाठी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील दिनांक २८.०७.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत सोनगीर गावाने तापी नदीवरून स्वतंत्र योजनेची मागणी केली.

८. सोनगीर गावासाठी तापी नदीवरून स्वतंत्र योजना करावयाची झाल्यास अंदाजित खर्चाचा (रू.३७ कोटी) विचार करता व प्रस्तावित जलशुध्दीकरण केंद्राचे तापी नदी उद्भवापासूनचे अंतर सुमारे २७ कि.मी. इतके असल्याने, तसेच दोन्ही ठिकाणच्या पंपींग मशिनरीसाठी होणारा विद्युत देयकाचा खर्च अंदाजे रू.६६ लक्ष प्रतिवर्ष हा सोनगीर गावास पेलविणे कठीण दिसते.

९. सोनगीर प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेत समाविष्ट १९ गावांपैकी १७ गावांकरिता सन २०१२-१३ ते सन २०१७-१८ या कालावधीत जिल्हा परिषदेमार्फ़त स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या आहेत. सदर योजनांतून गावांना पाणी पुरवठा करण्यात येत आहे. सदर योजनेत समाविष्ट १९ गावांपैकी सोनगीर, दापूरा, दापूरी व वालखेडा ही ४ गावे वगळता उर्वरीत १५ गावांचा समावेश जल जीवन मिशन (राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम) सन २०१९-२० च्या कृती आराखड्यात समाविष्ट चिमठाणे व ८५ गावे (ता. शिंदखेडा) प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेअंतर्गत करण्यात आला असून सर्वेक्षणाचे काम प्रगतीपथावर आहे.

१०. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, धुळे कार्यालयात सहायक भूवैज्ञानिकाचे ०१ व कनिष्ठ भूवैज्ञानिकाची ०२ पदे मंजूर असून सद्यस्थितीत तीनही पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषद, धुळे यांचेकडील भूवैज्ञानिकांची मागणी व कामाची निकड विचारात घेवून विभागीय उपसंचालक, नाशिक यांचे दिनांक ०३.०३.२०२० रोजीच्या आदेशानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, नंदूरबार येथील श्री.वाय.डी. पाटील, कनिष्ठ भूवैज्ञानिक यांच्या सेवा तात्पुरत्या स्वरूपात सर्वेक्षणाच्या कामासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच राज्यातील १०९ भूवैज्ञानिकांचे रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरणेसाठी शासनस्तरावरून मागणीपत्र आयोगास पाठविलेले असून, आयोगाचे सूचनेनुसार सुधारीत दिव्यांगांचे आरक्षणाबाबत शासनाने सामाजिक न्याय विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

११. पिण्याच्या पाण्याच्या टंचाई उपाययोजनेतंर्गत धुळे जिल्ह्यास सन २०१८-१९ वर्षात रू.३११.२३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच सन २०१९-२० वर्षात रू.३६६.९५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला असून प्रलंबित रू. २०९.९२ लक्ष निधी मागणी संदर्भात महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**********

सर्वश्री.किसन कथोरे, संजय केळकर, गणपत गायकवाड, कुमार आयलानी, ॲड. आशिष शेलार, श्री.विश्वनाथ भोईर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना खालील प्रमाणे :-

"ठाणे जिल्हयातील अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषद हद्दीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे जलव्यवस्थापन असून बदलापूर व अंबरनाथ नगरपरिषद हद्दीमध्ये पाणी पुरवठा करणा-या ब्यारेज, बारवी धरण भोज, चिखलोली या धरणांमध्ये मोठया प्रमाणात पाणी साठा उपलब्ध असूनही माहे मार्च २०१६ पासून नवीन नळजोडण्या बंद करुन अधिका-यांनी कृत्रिम पाणीटंचाई करणे, नवीन नळजोडण्या बंद करण्याचे कोणतेच कारण अथवा अडचणी नसणे, त्यामुळे नागरिकांनी व नवीन गृह संकुल विकासकांनी अनाधिकृतपणे नळजोडण्या घेण्यात येणे, माहे सप्टेंबर व नोव्हेंबर २०१६ दरम्यान अनाधिकृत नळजोडण्याचे सर्वेक्षण करण्यात आले त्यानुसार बदलापूर शहरात ५९० व अंबरनाथ शहरात १५८० म्हणजेच एकूण सुमारे २१७० नळजोडण्या अनाधिकृतपणे झाल्याचे आढळून येणे, माहे जानेवारी २०१८ पर्यंत संभाव्य अनाधिकृत नळजोडण्या सुमारे ४,३४० पर्यंत झालेल्या असणे, त्यामुळे या अनाधिकृत नळ जोडण्याचे पाणी देयक सुमारे ११ ते १२ कोटी रुपये होत असून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वरिष्ठ अधिका-यांच्या मनमानी कारभारामुळे शासनाचे ११ ते १२ कोटी रुपयांचे नुकसान झालेले असणे, बदलापूर व अंबरनाथ शहरातील विकासक व नागरिकांमध्ये अधिकृत नळ जोडण्या न दिल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनाच्या विरोधात प्रचंड संताप व नाराजीचा सूर असणे, अंबरनाथ व बदलापूर शहरातील नागरिकांना हक्काच्या पिण्याच्या पाण्यापासून वंचित ठेवणा-या तसेच शासनाची दिशाभूल व फसवणूक करुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे व पर्यायाने शासनाचे ११ ते १२ कोटी रुपयांचे नुकसान करणा-या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संबंधित अधिका-यांवर कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

<u>मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन</u>

अंबरनाथ व बदलापूर शहरातील पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करण्याच्या दृष्टीने अस्तित्वातील ग्राहकांना पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होणे आवश्यक असल्याने, अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या दि.३१.३.२०१६ च्या पत्रान्वये अंबरनाथ विभागामार्फत देण्यात येणा-या घरगुती / व्यावसायिक नळजोडणी व इतर नळजोडणी पुढील आदेश मिळेपर्यंत देण्यात येऊ नयेत, असे निर्देश देण्यात आले होते. सन २०१६ मध्ये पर्जन्यमान समाधानकारक झाल्यामुळे मध्यवर्ती कार्यालयाच्या दि.२४.११.२०१६ च्या आदेशानुसार जानेवारी, २०१७ पासून अंबरनाथ व बदलापूर शहरांतर्गत नळजोडण्या देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, ती आजतागायत सुरु आहे. उपरोक्त नवीन नळजोडण्या देण्यात येऊ नयेत हा निर्णय पाटबंधारे विभागाने ३० टक्के पाणीकपात जाहीर केल्यामुळे घेण्यात आला होता.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीच्या पाणी पुरवठा केंद्रांमार्फत सहकारी गृहनिर्माण प्रकल्प व खाजगी क्षेत्रातील विकासकामार्फत उभारण्यात येणा-या निवासी वसाहतींना पाणी पुरवठा करण्याकरिता नवीन नळजोडणी मंजूर करीत असताना, भांडवली अंशदान घेण्याचा निर्णय प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आला होता. तथापि, भांडवली अंशदानाची रक्कम भरण्यास अंबरनाथ व बदलापूर शहरातील स्थानिक लोकप्रतिनिधी, विकासक व स्थानिक नागरिकांनी विरोध दर्शविला होता म्हणून सदर भांडवली अंशदानाची रक्कम अंदाजित पाण्याच्या परिमाणाच्या

घनमिटर एककाऐवजी सदनिकेच्या बिल्टअप क्षेत्रानुसार परिगणित करण्याबाबत सुधारित धोरणात्मक निर्णय घेण्यात आला असून त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या धोरणात्मक निर्णयानुसार, अस्तित्वातील अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी सुधारित भांडवली अंशदानाची रक्कम भरावी लागणार असल्याने, स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी नाममात्र शुल्क आकारणी करण्याबाबत विनंती केली आहे. तथापि, दोन्ही शहरातील स्थानिक नागरिक अथवा विकासक अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याकरिता उत्सुकता दर्शवित नाहीत, असे निदर्शनास आले आहे.

अंबरनाथ व बदलापूर शहरांतर्गत ब-याच ठिकाणी अवैध नळजोडण्या दिल्या जात असल्याच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, अंबरनाथ शहरात एकूण १५८० व बदलापूर शहरात ५९० अशा एकूण २१७० नळजोडण्या अवैध असल्याचे आढळून आले.

अंबरनाथ व बदलापूर शहरातील असलेल्या २१७० इतक्या अवैध नळजोडण्या नियमित करण्याबाबत विभागीय कार्यालयास निर्देशित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने, वर्तमानपत्रात जाहिररित्या आवाहन करुन सदर अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्यासाठी अर्ज करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. तथापि, त्यास प्रतिसाद प्राप्त न झाल्याने अर्ज करण्याची मुदत वाढवून देण्यात आली होती. सदरच्या कालावधीत अंबरनाथ शहरातील ९५० अनधिकृत नळजोडणीधारकांनी त्यांच्या अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करण्याकरिता अर्ज सादर केले होते. त्यापैकी, ७८५ अवैध नळजोडण्या नियमित करण्यात आल्या आहेत. उर्वरित १६५ नळजोडण्यांपैकी ७४ नळजोडण्या अवैधपणे वसलेल्या वस्तीमधील असल्यामुळे त्याबाबत संबंधित नगरपरिषदेस अवगत करण्यात आले आहे. बदलापूर शहरातील २७२ अनधिकृत नळजोडणी धारकांनी त्यांच्या नळजोडण्या अधिकृत करण्याबाबत अर्ज सादर केले होते. त्यातील वैयक्तिक नळधारकांच्या २० अर्जांपैकी १४ नळधारकांना नळजोडण्या नियमित करण्यात आल्या आहेत. उर्वरित २५२ नळजोडण्या गृहसंकुलाच्या वाढीव नळजोडणीपोटीची असून त्याकरिता आकारावयाच्या भांडवली अंशदानाची रक्कम कशी आकारावयाची याबाबत निर्णय घेण्यात येत आहे. अंबरनाथ, बदलापूर शहरातील अनधिकृत नळजोडण्यांच्या संदर्भात तत्कालीन राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांच्याकडे झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार दि.३.८.२०१८ रोजी वृतपत्रात जाहिररित्या आवाहन करुन प्रथमत: दि.५.९.२०१८ पर्यंत व नंतर दि.६.१०.२०१८ अखेरपर्यंत अनधिकृत नळजोडण्या नियमित करण्याबाबत अर्ज सादर करण्याची विनंती करण्यात आली होती. त्यानुसार अंबरनाथ शहरांतर्गत व बदलापूर शहरांतर्गत प्राप्त अर्जांची छाननी करुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अंबरनाथ बदलापूर कार्यक्षेत्रातील परिस्थिती, पाण्याची उपलब्धता इ. बाबींचा विचार करुन, नवीन नळजोडणी देणे अथवा न देणेबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत निर्णय घेण्यात येतो. तसेच अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करता असताना, तत्कालीन राज्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत नळजोडण्या अधिकृत करत असताना, सदनिकाधारक अथवा गृहसंकुलाकडून मागील दोन वर्षाचे अथवा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या दिनांकापासूनच्या कालावधीकरीता यापैकी जो जास्त कालावधी आहे त्याकरिता दंडात्मक पाण्याच्या देयकाची आकारणी करण्यात येते. त्यामुळे अनधिकृत नळजोडण्यांमुळे प्राधिकरणाचे नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

*****************

सर्वश्री प्रशांत ठाकूर, महेश बालदी, अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड आशिष शेलार, श्री.कालीदास कोळंबकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम, १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना खालील प्रमाणे :-

"पनवेल (जि.रायगड) महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी उन्हाळ्यामध्ये भेडसावत असलेली पिण्याच्या पाण्याची समस्या याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणा-या शहरी भागातील योजना वाढत्या लोकसंख्येमुळे कमी पडत असल्याचे माहे फेब्रुवारी २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, पनवेल महानगरपालिका क्षेत्राकरीता केंद्र शासनाच्या अमृत योजनेंतर्गत १०० एमएलडी पाण्याची तरतुद करणारी पाणी पुरवठा टप्पा-२ ही योजना मंजूर करण्यात आली असणे, उक्त योजनेसाठी जवळपास ४०८ कोटी रुपये खर्च करण्यात येणा-या पाणी पुरवठा योजनेला केंद्र शासनाकडून १७० कोटी रुपये निधी उपलब्ध होणार असणे, उक्त योजनेच्या प्रकल्पाच्या निविदा मंजूर होवून बराच कालावधी होवून सुध्दा अद्यापही कार्यारंभ आदेश देण्यात आला नसणे, चालू आर्थिक वर्षात कार्यारंभ आदेश न दिल्यास केंद्र शासनाकडून उक्त योजनेसाठी देण्यात येणारा १७० कोटीचा रुपयांचा निधी वापराविना परत जाण्याची शक्यता निर्माण होणार असणे, पनवेल महानगर क्षेत्रातील मोठया प्रमाणात होत असलेले वाढते नागरीकरण तसेच नव्याने होत असलेल्या नवी मुंबई विमानतळ बाधीत प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन पाहता भविष्यात पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता केंद्र शासनाची अमृत योजना तातडीने कार्यान्वीत होण्याची नितांत गरज त्यासाठी शासनाने त्वरीत करावयाची आवश्यक ती कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया"

<u>मा.मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन :-</u>

वाढीव न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३, ता.पनवेल, जि.रायगड या योजनेच्या अंदाजपत्रके व आराखडे यांना दिनांक ५.९.२०१८ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांनी रु. ४०८.७९ कोटी इतक्या ढोबळ किंमतीस तांत्रिक मान्यता दिली आहे. दिनांक १.११.२०१८ च्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत पनवेल महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि. हिश्श्याची रक्कम अमृत अभियान कार्यक्रमांतर्गत स्विकारण्यास मान्यता दिली आहे. वाढीव न्हावा-शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३ मधील ग्राहक निहाय पाण्याची मागणी व भांडवली अंशदानाची रक्कम खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | ग्राहकाचे नांव | पाणी मागणी (द.ल.ली./दिन) | भांडवली अंशदानाची रक्कम (रु.कोटी) |
|---|---|---|---|
| १. | पनवेल महानगरपालिका | १००.०० | २०२.८५ |
| २. | जे.एन.पी.टी. | ४०.०० | ४८.६६ |
| ३. | सिडको | ६९.०० | ९७.५० |
| ४. | एम.एम.आर.डी.ए. | १९.०० | ५९.७८ |
| एकूण | | २२८.०० | ४०८.७९ |

सदर योजनेमध्ये असलेल्या पनवेल महानगरपालिकेच्या १०० द.ल.लि.प्रति दिवस पाणी मागणीच्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत पनवेल शहराच्या पाणी पुरवठा योजनेस नगर विकास विभागाच्या दि.१२.२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या योजनेतील स्थापत्य कामाच्या रु.२४७.६६ कोटी किंमतीच्या प्रारुप निविदा प्रपत्रास मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,ठाणे कार्यालयाने मंजूरी दिली आहे. त्यानुसार या कामाची ई-निविदा सुचना क्रमांक ३३ सन २०१८-१९ नुसार दि.१.३.२०१९ रोजी प्रथम मागणी करण्यात आली. या निविदेची अंतिम तारीख १६.४.२०१९ पर्यंत होती. सदर निविदेस तीन वेळेस मुदतवाढ दि.२७.५.२०१९ पर्यंत देण्यात आली. यावेळेस फक्त २ कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झाल्या.

प्रथम निविदेस पुरेशी स्पर्धा न झाल्याने दि.३०.५.२०१९ रोजी द्वितीय निविदा जाहीर करण्यात आली. यास देखील अंतिम मुदत दि.१४.६.२०१९ पर्यंत कंत्राटदाराकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे या कामाची तृतीय निविदा जाहीर करण्यात आली. यामध्ये ३ कंत्राटदारांकडून सहभाग प्राप्त झाला. सदर कंत्राटदारांचा देकार उघडला असता, न्युनतम देकार हा निविदा किंमतीपेक्षा (सन २०१८-१९ च्या दरसूची) हा ५४ % जादा दराचा आला.

सदर कंत्राटदारासोबत प्रथम मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे यांच्या स्तरावर वाटाघाटी करण्यात आल्या. तथापि, त्याबाबत कंत्राटदाराने देकार कमी करण्यास असमर्थता दर्शविली. त्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि कंत्राटदार यांच्यात झालेल्या वाटाघाटीत कंत्राटदाराने निविदा किंमतीवर ३६.९३९ टक्के जादा दराचा सुधारीत देकार सादर केला आहे. सध्याच्या सन २०१९-२०२० च्या दरसूचीनुसार सदर देकार १८.६१५ टक्के जादा येतो.

जादा दराने निविदा प्राप्त झाली असल्याने वाढलेल्या कामाच्या किंमतीचा सहभागही प्रत्येक ग्राहकावरही येणार आहे. सदर निविदा निर्णयार्थ प्राधिकरणाच्या निविदा समितीच्या बैठकीत ठेवण्यात आला आहे. त्याअनुषंगाने निविदेबाबतची पुढील कार्यवाही निविदा समिती स्तरावर सुरु आहे.

याबाबत अमृत अभियानाचा भाग या योजनेत समाविष्ट असल्याने निविदा समितीत उचित निर्णय झाल्यानंतर नगर विकास विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील.

या योजनेबाबत सर्व बाबी तपासून पुढील निर्णय लवकरात लवकर घेण्यात येतील.

*****************

एच-1553-1a

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री. विकास ठाकरे, बळवंत वानखडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, सर्वश्री. राजु पारवे, सुभाष धोटे, अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, कु.प्रणिती शिंदे, सर्वश्री.पृथ्वीराज चव्हाण, कुणाल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय विभाग, वनविभाग नगरविकास विभाग ई. विभागामार्फत प्रसिध्दी मोहिम सन २०१६-२०१९ या वर्षात राबविली जाणे, जाहिरात प्रसिध्दीच्या कार्यात मे.राकेश ॲडवटाईज प्रा.लि. मुंबई व श्री ओम एडवर्टाइज मुंबई या दोन कंत्राटदारांना कार्यादेश मिळणे, दोन्ही कंत्राटदारांकडून राज्य परिवहन मंडळाच्या शासकीय जाहिरातीची २० कोटी रक्कम भरणे अनिवार्य असणे, सदर अठरा ते वीस कोटी रुपये मंडळाला न भरता थकीत ठेवणे, त्यांस अधिकाऱ्यांचा पाठिंबा असल्याचे निदर्शनास येणे, दोन्ही कंत्राटदार यांनी महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागाच्या राज्य परिवहन बस स्थानक व बसेस वर जाहिरात प्रसिध्द करावयाची निवेदनानुसार अनिवार्य असणे, परंतु तसे न होता जाहिरात प्रसिध्द न करता विविध बस आगरचे बनावट जाहिरात प्रदर्शन अहवाल सादर करुन शासनाकडून करोडो रुपयाची देयके पारित करुन घेणे, त्यामुळे मंडळाची तसेच शासनाची फसवणूक व भ्रष्टाचार झाल्याचे लोकप्रतिनिधींनी वारंवार महासंचालक माहिती व जनसंपर्क यांचे लक्षात आणून देऊनही महासंचालक यांनी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणतीही कार्यवाही न करणे, अधिकारी व कंत्राटदार यांचे मध्ये साटेलोटे असल्याबाबत लोकप्रतिनिधी व जनमाणसात पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

## नि वे द न

{ॲड.अनिल परब, मा.मंत्री (परिवहन)}

राज्य परिहवन महामंडळाच्या बसेसवर पॅनेलव्दारे जाहिरात करण्याकरिता मे.राकेश ॲडव्हटायझिंग प्रा.लि. व महामंडळाच्या बसस्थानकांवर होर्डिंग्जव्दारे जाहिरात करणे करिता मे.श्री ओम ॲडव्हटायझर्स याची ई-निविदेव्दारे महामंडळाचे अधिकृत परवानाधारक म्हणून नियुक्ती केली आहे.

मे.राकेश ॲडव्हटायझिंग प्रा.लि. यांच्या सोबत केलेल्या करारपत्रामध्ये शासकीय जाहिरातीपोटीची रक्कम अदा करताना शासकीय जाहिरातीच्या कार्यादेशात नमुद रकमेच्या २०% रक्कम तर मे.श्री ओम ॲडव्हटायझर्स यांच्या सोबत केलेल्या करारपत्रामध्ये शासकीय जाहिरातीपोटीची रक्कम अदा करताना शासकीय जाहिरातीच्या कार्यादेशात नमुद रकमेतून सर्व प्रकारचे कर वगळता येणाऱ्या रकमेच्या २०% रक्कम राज्य परिवहन महामंडळास कार्यादेशाच्या तारखेपासून ६ महिन्यांच्या कालावधीत अदा करणेबाबत नमुद केले आहे.

उक्त तरतूदीच्या अधिन राहून मे.राकेश ॲडव्हटायझिंग प्रा.लि.यांनी अदयापपर्यंत रु.३,३७,०६,६६५/- व मे.श्री ओम ॲडव्हटाझर्स यांनी रु.२८,१२,७५२/- इतकी रक्कम राज्य परिवहन महामंडळास अदा केली आहे. परवानाधारकांनी अदयापपर्यंत महामंडळाकडे भरणा न केलेल्या रकमेचा भरणा करणेकरिता परवानाधारकास

मोटा/पच 1603 (800-3-2020)

लेखी सुचित करण्यात आले असून सदर रकमेचा भरणा करेपर्यंत मे.राकेश ॲडव्हटायझिंग प्रा.लि. एजन्सी यांची रु.२,३८,७०,०००/- व मे.श्री ओम ॲडव्हटाइझर्स यांची रु.२,८३,५०,०००/- रा.प. महामंडळाकडे जमा असलेली सुरक्षा अनामत रक्कम वळती करुन घेण्यात आली आहे. त्याचप्रमाणे परवानाधारकांची थकीत रक्कम वसुल होण्याच्या दृष्टीने ज्या शासकीय विभागांच्या जाहिराती परवानाधारकाने प्रदर्शित केल्या होत्या त्या शासकीय विभागांना परवानाधारकाने राज्य परिवहन महामंडळास उक्त नमुद तरतूदीनुसार देय असलेली रक्कम राज्य परिवहन महामंडळाकडे वर्ग केल्यानंतरच देयक अदा करणेबाबत राज्य परिवहन महामंडळाकडून कळविण्यात आले आहे. राज्य परिवहन महामंडळामार्फत देय रक्कम वसुल करणेबाबत सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत. उक्त वस्तुस्थिती लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळाने संबंधित परवानाधारकाकडून थकीत रक्कम वसुल करण्याकरिता आवश्यक ती कार्यवाही केली असून राज्य परिवहन महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली आहे.

तसेच, मे.राकेश ॲडव्हटायझिंग प्रा.लि. यांच्या ६ व मे.श्री ओम ॲडव्हटायझर्स यांच्या १२ प्रमाणपत्रांबाबत साशंकता निर्माण झाल्यामुळे व परवाना धारकांच्या जाहिरात प्रदर्शनासंदर्भातील प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सुरक्षा व दक्षता अधिकारी, राज्य परिहवन महामंडळ यांचेमार्फत चौकशी केली असता, या संस्थांनी बनावट प्रमाणपत्रे सादर केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार या संस्थांवर पुढील कारवाई करण्यात येत आहे.

*****

पच/1603 - 1a

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२० चे व्दितीय (अर्थसंकल्पिय) अधिवेशन

सर्वश्री. विक्रमसिंह सावंत, अमीन पटेल, पृथ्वीराज चव्हाण, हिरामण खोसकर, लहू कानडे, सुरेश वरपुडकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री, विकास ठाकरे, सुभाष धोटे, कुणाल पाटील, ऋतुराज पाटील, धिरज देशमुख, मोहनराव हंबर्डे, राजेश एकडे, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.राजु पारवे, अॅड.राहूल कुल, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यामध्ये परिवहन महामंडळाने ज्येष्ठ नागरीकांसाठी एस.टी.प्रवासात सवलत देण्यासाठी स्मार्ट कार्डाची योजना राबविण्यात येत असणे, परंतू स्मार्ट कार्ड मिळविण्यासाठी जाचक अटीमुळे जेष्ठ नागरीकांना अतिशय त्रास सहन करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, यामुळे अनेक जेष्ठ नागरीक या योजनेपासून वंचित राहत असल्याचे आढळून येणे, अनेक ठिकाणी अनाधिकृत एजंट राजरोसपणे १०० ते १५० रुपये घेऊन जेष्ठ नागरीकांची लूट करीत असल्याचे आढळून येणे, रिचार्ज स्टेशनची यंत्रणा खोडोपाडी, शहरी व निमशहरी भागामध्ये नसल्यामुळे सदरहू ठिकाणी रिचार्ज स्टेशन उभारण्याची आवश्यकता असल्याचे आढळून येणे, तसेच प्रत्येक वर्षी ७० रुपये भरुन स्मार्ट कार्डाचे नुतनीकरण करावा लागत असल्याने जेष्ठ नागरीकांना वयोमानानुसार या सर्व गोष्टी करणे अतिशय त्रासदायक होत असणे, यामुळे त्यांच्यात निर्माण झालेला असंतोष, जेष्ठ नागरीकांना स्मार्ट कार्ड देण्यासाठी घालण्यात आलेल्या जाचक अटी शिथील करुन त्यांना सहजरितीने स्मार्ट कार्ड मिळण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

## नि वे द न

**{अॅड.अनिल परब, मा.मंत्री (परिवहन)}**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे वयाच्या ६५ वर्षांपुढील ज्येष्ठ नागरिकांना प्रवासभाडे सवलतीकरिता स्मार्टकार्ड देण्याचा निर्णय घेण्यात आलेला असून, सदरचे स्मार्टकार्ड प्राप्त करण्यासाठी फक्त आधारकार्ड व भ्रमणध्वनी क्रमांकाची आवश्यकता आहे. स्मार्टकार्ड अनिवार्य करण्याची मुदत दि.०१.०४.२०२० पर्यंत असून, या तारखेपर्यंत ज्येष्ठ नागरिक स्मार्टकार्डशिवाय यापुर्वी विहित केलेल्या ओळखपत्रांच्या आधारे सवलतीचा लाभ घेवू शकतील

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाद्वारे खेडोपाडी, शहरी व निमशहरी अशा २५० बसस्थानकांवरुन स्मार्टकार्ड नोंदणीकरण व वितरणाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे व सदर कामासाठी ३४०० खाजगी प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली आहे, त्यांचेमार्फत पुनर्भरण (रिचार्ज) सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. सद्यस्थितीत स्मार्टकार्डसाठी ३२.४३ लाख ज्येष्ठ नागरिकांनी नोंदणीकरण केले असून, त्यापैकी २३.८९ लाख स्मार्टकार्ड वितरित करण्यात आले आहेत.

छोटा/पच - 1604 (800-3-2020) कृ.मा.प...

D:\गणेश प्रतापराव यादव\२०२०\अधिवेशन\उत्तर\लक्षवेधी\लक्षवेधी सभा श्री.विक्रमसिंह सावंत स्मार्टकार्ड ज्येष्ठ नागरिक.doc

राज्य परिवहन बसस्थानकांतून स्मार्टकार्ड प्राप्त केल्यास रु.५०/- व खाजगी प्रतिनिधींकडून प्राप्त केल्यास रु.७०/- इतके शुल्क आकारण्यात येत आहे व स्मार्टकार्डचे नुतनीकरण वर्षातून एकदाच करावे लागणार असून, सदरचे नुतनीकरण राज्य परिवहन बसस्थानकांवर केल्यास रु.३/- व खाजगी प्रतिनिधींकडे केल्यास रु.१५/- एवढे शुल्क अदा करावे लागेल. स्मार्टकार्ड प्राप्त करण्याकरिता खाजगी प्रतिनिधींकडून महामंडळाने विहित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क आकारले जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारींच्या अनुषंगाने ८ प्रतिनिधींचा परवाना महामंडळाद्वारे रद्द करण्यात आलेला आहे.

*****

फच-1604-1a